दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -१२६ | शनिवार दि.१० जानेवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-126 | Saturday, Dt.10 January 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## अपघातात रीलस्टार पित्याचा मृत्यू, लेक पंकजा मुंडेंना म्हणाली, मला शिकायचंय

### ताईंनी एका क्षणात दिला शब्द; म्हणाल्या, मी तुझ्या पाठीशी!

ऊस वाहतुकीदरम्यान ट्रॅक्टरच्या ट्रॉलीखाली सापडून अपघाती मृत्यू झालेल्या ऊसतोड मजूर गणेश डोंगरे (Ganesh Dongare) यांच्या कुटुंबीयांना राज्याच्या ग्रामविकास व महिला बालविकास मंत्री पंकजा मुंडे (Pankaja Munde) यांनी मदतीचा हात दिला आहे. या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच पंकजा मुंडे यांनी तत्काळ दखल घेत कार्यकर्त्यांच्या माध्यमातून डोंगरे कुटुंबाला आर्थिक मदत पाठवली असून, फोनवरून कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. तसेच लवकरच प्रत्यक्ष भेट घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी (सोन्नाखोटा) येथील रहिवासी गणेश डोंगरे हे ऊसतोडणीसाठी धाराशिव (लातूर) जिल्ह्यातील एका साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात गेले होते. ऊस वाहतुकीदरम्यान झालेल्या भीषण अपघातात ट्रॅक्टरची ट्रॉली त्यांच्या अंगावर कोसळली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेत कुटुंबाचा कर्ता पुरुष काळाच्या पडद्याआड गेल्याने पत्नी, तीन चिमुकल्या मुली आणि वृद्ध आई-वडील अक्षरशः उघड्यावर आले आहेत.

गणेश डोंगरे यांच्याकडे केवळ एक एकर शेती होती. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत राहणाऱ्या या कुटुंबासाठी गावातील उत्पन्न अपुरे पडत असल्याने गणेश आणि त्यांची



पत्नी अश्विनी यांनी गेल्या काही वर्षांपासून ऊसतोडणीचा मार्ग स्वीकारला होता. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन कष्टाची कामे करत आपल्या तीन मुलींचे भविष्य घडवण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले होते. मात्र, एका क्षणात सगळे काही उद्ध्वस्त झाले.

पत्नीने फेसबुक लाईव्ह करताच दुर्दैवी घटना

या घटनेला अधिक वेदनादायक वळण देणारी बाब म्हणजे, अपघाताच्या वेळी पत्नी अश्विनी फेसबुकवर लाईव्ह होती. लाईव्ह सुरू असतानाच ट्रॉली गणेश यांच्या अंगावर पडल्याची दृश्ये समोर आल्याने ही घटना सोशल मीडियावर झपाट्याने वरल झाली. गणेश डोंगरे हे सोशल मीडियावर 'रीलस्टार' म्हणून ओळखले जात होते. त्यामुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात या घटनेबाबत तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

"मी तुझ्या पाठीशी"

दरम्यान, या दुर्घटनेची माहिती मंत्री पंकजा मुंडे यांना मिळाल्यानंतर त्यांनी संवेदनशीलतेने दखल घेतली. आज त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून डोंगरे कुटुंबाला आर्थिक मदत पाठवली. यासोबतच फोनवरून कुटुंबीयांशी थेट संवाद साधत त्यांना मानसिक आधार दिला. यावेळी गणेश डोंगरे यांची मोठी मुलगी यशश्री हिने, "मला शिकायचं आहे," अशी इच्छा व्यक्त केली असता, पंकजा मुंडे यांनी, "मी तुझ्या पाठीशी आहे. तुला जे शिक्षण घ्यायचं आहे ते घे.

## मकरसंक्रांत होणार गोड!

पुणे: येत्या काही दिवसांमध्ये लाडक्या बहिणींसाठी (Ladki Bahin Yojana) खुशखबर आहे. 'देवाभाऊंकडून लाडक्या बहिणींना मिळणार मकर संक्रांतीची मोठी भेट!' अशा प्रकारचे पोस्टर सध्या सोशल मिडीयावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. येत्या १४ जानेवारीपूर्वी पात्र लाडक्या बहिणींच्या (Ladki Bahin Yojana) बँक खात्यामध्ये तीन हजार रुपये जमा होणार असल्याचा दावा करण्यात येत आहे, याबाबतचे पोस्टर सोशल मिडीयावरती शेअर केले जात आहेत.(Ladki Bahin Yojana)

तर राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान आहे. तर, महायुतीतील दोन घटकपक्षांच्या उमेदवारांकडून त्यांच्या सोशल मिडीया अकाऊंटवरून येत्या १४ जानेवारीपूर्वी लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात तीन हजार रुपये जमा होणार असल्याचा दावा केला जात आहे. सरकारकडून मकरसंक्रातींच्या दिवशी निधी वितरित करण्यात आला तर निवडणुकीच्या आचारसंहितेचा हा भंग नाही का असा सवाल विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे.

## जालन्यात नागरिकांसाठी थेट पोलिस संपर्क सुविधा

### विशेष मोबाईल क्रमांक सुरू

जालना /प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील नागरिकांच्या विविध समस्या तक्रारी व पोलिस सेवांबाबत तात्काळ संपर्क साधता यावा यासाठी जालना पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने एक विशेष मोबाईल क्रमांक सुरू करण्यात आला आहे.नियंत्रण कक्ष, जालना येथे नागरिकांच्या सोयीसाठी ९६४१२१११०० हा दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला असल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली आहे.या संपर्क क्रमांकावरून नागरिकांना थेट आपल्या समस्या,तक्रारी,अर्ज अथवा आवश्यक माहिती पोलिसांकडे देता येणार आहे.विशेष म्हणजे खालील महत्त्वाच्या बाबींविषयी नागरिक या क्रमांकावर संपर्क साधू शकणार आहेत (उर्वरीत पान २ वर)

## ना.चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांची नांदेड येथील निवासस्थानी सदिच्छा भेट!



धर्माबाद /प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री तथा आमचे मार्गदर्शक ना. श्री.चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांनी गुरुवार, दि. ८ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथील भाजपा आमदार राजेश पवार साहेब यांच्या निवासस्थानी

(उर्वरीत पान २ वर)

## नैसर्गिक अनुदान घोटाळ्यात मोठी कारवाई

### शेतकऱ्यांच्या नावावर बोगस अनुदान उचलणारा एजंट अटकेत

जालना /प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यांत नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासनाने जाहीर केलेल्या अनुदानावर डल्ला मारणाऱ्या टोळीवर आर्थिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली असून या घोटाळ्यात सहाय्य करणाऱ्या एका एजंटला अटक करण्यात आली आहे.नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पीक नुकसानीपोटी शासनाने वेळोवेळी ४ शासन निर्णय काढून शेतकऱ्यांना अनुदान मंजूर केले होते.मात्र अंबड व घनसावंगी तालुक्यांत अनुदान याद्या अपलोड करण्याची जबाबदारी असलेल्या काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगनमताने शेती नावावर नसलेली बोगस नावे याद्यांमध्ये टाकून कोट्यवधींचा अपहार केल्याच्या गंभीर तक्रारी समोर आल्या होत्या.या प्रकरणाची गंभीर दखल घेत तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी समिती गठीत केली.समितीने केलेल्या चौकशीत २४० गावांमध्ये तब्बल रु.२४,९०,७७,८११/- इतक्या शासकीय रकमेचा अपहार झाल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर पोलीस स्टेशन अंबड येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४५३/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले.

या गुन्ह्याचा तपास मा.पोलीस अधीक्षक जालना यांच्या आदेशान्वये आर्थिक गुन्हे शाखा, जालना करीत असून यापूर्वी या प्रकरणात १२ आरोपींना अटक करण्यात आली होती.

तपासादरम्यान अटक आरोपी पवन सुलाने याच्याकडे केलेल्या सखोल चौकशीत अनुदान याद्या तयार करताना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर,खुलताबाद,फुलंब्री व वैजापूर

(उर्वरीत पान २ वर)

## मोटारसायकल चोरी करणारा आरोपी जेरबंद



- ३५ हजार रुपये किमतीची होंडा शाईन मोटारसायकल जप्त
- स्थानिक गुन्हे शाखेची यशस्वी कारवाई

जालना /प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने राबवलेल्या विशेष मोहिमेत मोटारसायकल चोरी करणाऱ्या एका आरोपीला अटक करून त्याच्याकडून सुमारे ३५ हजार रुपये किमतीची होंडा शाईन मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्याबाबत मा.पोलीस अधीक्षक श्री.अजय कुमार बन्सल यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक कार्यरत होते.

दि. ८ जानेवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे तालवाडा ता.जालना परिसरातील एका संशयित इसमास ताब्यात घेण्यात आले. सखोल चौकशीत त्याने मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीकडून ३५,००० रुपये किमतीची होंडा शाईन मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. (उर्वरीत पान २ वर)


## बीड जिल्हा परिषदेत दिव्यांगांना पायऱ्या चढण्याचा त्रास कधी कमी होणार..?

### लिफ्ट नाही, दिव्यांगांसाठी रस्ता नाही, सीईओ साहेब किमान तक्रार निवारण बैठक तरी खाली घ्या..!

बीड / वैभव स्वामी

बीड जिल्हा परिषदेची भव्य दिव्य इमारत कोट्यावधी रुपये खर्च करून उभारण्यात आली. मात्र या इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात असूविधांच्या त्रुट्या मोठ्या प्रमाणात आहेत. दिव्यांगांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात अथवा इतर विभागात जाण्यासाठी लिफ्ट नाही किंवा दिव्यांगांसाठी स्वतंत्र रस्ता सुद्धा नाही.सीईओ जितिन रहेमान साहेब किमान आपली आठवड्यातून होणारी तक्रार निवारण बैठक तरी आपल्या दालनात न घेता खाली घ्यावी म्हणजे दिव्यांगांना त्रास कमी होईल.. या गंभीर प्रश्नावर इतक्या वर्षापासून दिव्यांग संघटना देखील गप्प का ? असा प्रश्न दिव्यांगासह आता सामान्य जनतेला सुद्धा पडत आहे.

बीड जिल्हा परिषदेची इमारत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या कार्यकाळात



आणि बीडच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे असताना कोट्यावधी रुपये खर्च करून उभारण्यात आली.मात्र या इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात असुविधांच्या त्रुट्या आहेत. आजही पाऊस आला तर इमारत मोठ्या प्रमाणामध्ये गळते.ठिबक सिंचन प्रमाणे या इमारतीची अवस्था होते.इमारत अवाढव्य जागेत उभारण्यात आली मात्र सुविधांचा अभाव मोठ्या प्रमाणात आहे. आजही जिल्हा परिषदेतील अर्ध्यापेक्षा जास्त जागा रिकामी पडून आहे.मात्र त्या इमारतींची डागडुजी अथवा इतर शासकीय कार्यालय या जागेत जिल्हा परिषदेचे कशी आणता येतील अशी व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेची विविध कार्यालय आजही हक्काची इमारत होऊनही बाहेर आहेत. यात प्रामुख्याने जिल्हा परिषदेचा माध्यमिक शिक्षण

(उर्वरीत पान २ वर)

### जिल्हाधिकारी खाली येऊन बैठक घेतात मग सीईओ साहेब आपल्याला काय अडचण..?

बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयात लिफ्टची सुविधा आहे. तरीसुद्धा जिल्हाधिकारी आपला जनता दरबार हा खाली ग्राउंड फ्लोअर वर ओपन जागेमध्ये घेऊन जनतेच्या समस्यांचा निपटारा करतात. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा हा आदर्श जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह इतर विभागातील अधिकाऱ्यांनी घेऊन जनतेच्या तक्रारी सोडवण्यासाठी आठवड्यातील एक दिवस निश्चित करून त्या बैठका दिव्यांगांना वयोवृद्धांना त्रास होणार नाही अशा ग्राउंड फ्लोअरवर घेतल्या तर अनेक अडचणींना सामोरे जाण्याची वेळ दिव्यांग आणि वयोवृद्धांना येणार नाही.

## माजलगाव तालुक्यात दशहत निर्माण करुन गुन्हे करणारे ३ गुंडाना पोलीस अधिक्षकांनी केले हद्दपार

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी बीड जिल्हयाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर बीड जिल्हयात होत असलेल्या चोऱ्या, घरफोड्या, खुन व खुनाचा प्रयत्न, दंगा, जबरी चोऱ्या, दरोडा टाकणारे गुन्हेगार व लोकांना मारहान करुन गंभीर जखमी करुन जनतेमध्ये दहशत निर्माण करणारे बीड जिल्हयातील गुन्हेगारावर पोलीस अधोक्षक श्री. नवनीत काँवत यांची करडी नजर आहे. असे गंभीर गुन्हे करणारे गुन्हेगारांच्या टोळयावर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी त्यांचे विरुध्द जास्तीत जास्त उचित प्रतिबंधक कारवाया करणे बाबत पो.स्टे. प्रभारी अधिकाऱ्यांना सुचना दिलेल्या आहेत.

पो.स्टे. प्रभारी अधिकारी माजलगाव शहर श्री. राहुल सुर्यतळ यांनी माजलगाव तालुक्यात टोळीने गुन्हे करणारे इसम १. अशोक वसंत मंदे वय २१ वर्षे २. कृष्णा तुकाराम निरडे वय २२ वर्षे ३. अभिषेक अशोक शिंदे वय २२ वर्षे सर्व रा. पावर हाऊस जवळ कचारवाडा ता. माजलगाव जि. बीड यांचे टोळीवर शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गंभीर गुन्हे, जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, दंगा करणे, जिवेमारण्याच्या धम्मक्या देणे, गंभीर



दुखापत करणे, सरकारी नोकरावर हल्ला करणे, रस्ता आडवणे, गैर कायदयाची मंडळी जमवणे, नुकसान करणे, कट रचने, जमाव बंदी आदेशाचे उल्लघन करणे, सार्वजनीक संपत्तीचे नुकसान करणे, झुज खेळणे, लोकांना मारहाण करुन जखमी करुन, गुंडगिरी करुन जनतेमध्ये दहशत निर्माण करणे असे गुन्हे दाखल असल्याने व त्यांची जनतेमध्ये दहशत निर्माण होत असल्याने सदर टोळीच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी व सदर टोळीची पांगा पांग करण्यासाठी त्यांचे टोळी विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे दि. १३.०९.२०२५ रोजी हद्दपार प्रस्ताव पोलीस अधिक्षक कार्यालयास सादर केला होता. सदर प्रस्तावाची उप विभागीय पोलीस

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

## संपादकीय....

# बिनविरोध येणारच!

जोपर्यंत सत्ता होती, तोपर्यंत सत्तेच्या जवळ जाण्याचा मार्ग म्हणून संघटनेच्या झेंड्याखाली कोणी ना कोणी दिसत होतं. सत्ता नाही, म्हणताच ही गर्दी हळूहळू पांगली. आता तर तो झेंडा धरायलाही कोणी नाही, अशी स्थिती झाली आहे. अंबरनाथमध्ये जी नामुष्की पत्करावी लागली, हे त्याचं पुढचं पाऊल आहे. वरिष्ठ नेतृत्वाकडून बळच मिळालेलं नसतं, तर ते त्यांचं ऐकतील कशाला? काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांना ही बाब कोणीतरी समजावून सांगायला हवी. एका बाजूला महानगराच्या कारभाऱ्यांच्या निवडीची धामधूम सुरू असताना दुसऱ्या बाजूला निमशहरी भागातील नगराध्यक्षांची सूत्र हाती घेण्याची प्रक्रियाही सुरू आहे. काही ठिकाणी थेट निवडून आलेला नगराध्यक्ष एका बाजूचा आणि नगरसेवक दुसऱ्या बाजूचे, तर काही ठिकाणी पूर्ण बहुमतासाठी काही नगरसेवक कमी पडत असल्याने पूर्ण बहुमत मिळवण्याची धडपड सुरू आहे. त्यातही काही ठिकाणी पक्ष नेतृत्व आणि स्थानिक नेतृत्वाचं एकमत आहे, तर काही ठिकाणी दुमत! त्यामुळे पक्षांतर्गत पेच मिटवता मिटवता नगराला 'स्थिर शासन' देण्याची कसरत अनेक ठिकाणी बघायला मिळते आहे. त्या गोंधळात नेमकं कोणी कोणाचा हात धरला आहे आणि कोणी कोणाचा हात सोडला आहे, तेच समजेनासं झालं आहे. अंबरनाथमध्ये तर मोठी गंमतच झाली. तिथे भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसचीच युती झाली. दोन्ही पक्षांच्या राज्यपातळीवरील नेत्यांना ही बाब समजली, तेव्हा दोन्हीकडे आश्चर्याचा धक्का बसला. काँग्रेसला जास्तच. कारण, आज देशपातळीपासून प्रत्येक पातळीवर काँग्रेसच्या दृष्टीने भाजप हाच अस्पर्शातला अस्पर्श आहे. बाकी कोणीही एक वेळ चालेल. पण, भाजप? ब्रम्हण्यम्!! काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी लगेच तलवार उपसली आणि आपल्या बाराही नगरसेवकांवर कारवाई केली. त्यांना पक्षातून निलंबित केलं. त्या नगरसेवकांसाठी हे आणखी सोयीचं झालं. सर्वच्या सर्व नगरसेवकांचा गट तयार झाला होताच. त्या संपूर्ण गटाने एकदिलाने भाजपमध्ये प्रवेश केला. काय मिळवलं काँग्रेसने? 'तेलही गेलं, तूपही गेलं अन् हाती धुपाटणं आलं'! यासाठी राजकारणात नेहमी समजून उमजून भूमिका घ्यावी लागते. काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांबाबतची पक्षातली नाराजी या प्रकाराने किमान ५० टक्क्यांनी वाढली असणार. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ हे ठार भाजपविरोधी आहेत, हे सर्वश्रुत आहे. पण, त्यांच्या या तडकाफडकी कारवाईचा फायदा शेवटी झाला भाजपलाच! त्यापेक्षा नगरसेवकांच्या गटाला पाचारण करून त्यांच्याशी चर्चा केली असती, त्यांना चर्चेत ठेऊन अन्य काही मार्ग काढला असता, तर नुकसान कमी करता आलं असतं. पण, केवढा धीर आणि मुत्सद्देगिरी - हे दोन्ही कमी पडलं. 'दुष्काळात तेरावा महिना' अशी काँग्रेस संघटनेची स्थिती झाली! अशीच एक युती आकोटमध्येही घडली. स्थानिक भाजप आणि आयआयएम यांची युती. इथे धक्का बसला भाजपला. संपूर्ण राज्यात मतदारांचं ध्रुवीकरण होत असताना त्या प्रक्रियेला या युतीने चांगलाच ब्रेक बसला असता. संपूर्ण राज्यात भाजपच्या दृष्टीने चुकीचा संदेश गेला असता. पक्षनेतृत्वाने ताबडतोब दखल घेऊन युती मोडली आणि अनर्थ टळला. इथे युती मोडली, तरी भाजपमधला एकही जण हलला नाही किंवा सत्ताप्राप्तीसाठी कोणी आणखी कोणता मार्ग निवडला नाही. एमआयएमचा गटही अजून तरी शांत आहे. तो तसाच राहील, असं स्थानिकांचं म्हणणं आहे. काँग्रेस पक्ष संघटनेवरची नेतृत्वाची पकड पूर्णपणे सुटली आहे, असं माध्यमं पुनःपुन्हा सांगताहेत. पण, त्या पक्षाची धुरा केंद्रात आणि राज्यात ज्यांच्या हाती आहे, त्यांना हे म्हणणं गंभीरपणे घ्यावंसं वाटत नाही. काँग्रेसमध्ये आज जेवढा विस्कळीतपणा दिसतो, तेवढा तो कधीच नव्हता. लागोपाठ पराभवांनी पक्षाची घडी विस्कटली आहे, असं नाही. स्वातंत्र्यापासून दीर्घकाळपर्यंत सत्ताधारी राहिल्याने पक्ष संघटना पूर्णपणे सत्ताधीन झाली होती. 'निवडून येणे' एवढाच निकष झाला होता. त्यामुळे पक्षनिष्ठा, संघटनशिस्त, पक्षाच्या व्यापक विचारसरणीशी बांधिलकी - या सगळ्याच गोष्टी गौण झाल्या होत्या. सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्यांभोवती संघटना फिरू लागली होती. जोपर्यंत सत्ता होती, तोपर्यंत सत्तेच्या जवळ जाण्याचा मार्ग म्हणून संघटनेच्या झेंड्याखाली कोणी ना कोणी दिसत होतं. सत्ता नाही, म्हणताच ही गर्दी हळूहळू पांगली. आता तर तो झेंडा धरायलाही कोणी नाही, अशी स्थिती झाली आहे.

# अखेर तिचे स्वप्न पूर्ण झाले!

## संघर्षातून घडलेले यश : आष्टीच्या उजमा शेख बनल्या पीएसआय, शहरात जल्लोषात स्वागत

आष्टी (राजेंद्र लाड)

जिद्द, मेहनत आणि अपार कष्टांच्या बळावर कोणतेही स्वप्न साकार करता येते, हे आष्टीच्या लेकीने सिद्ध करून दाखवले आहे. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत (चझडउ) घेण्यात आलेल्या परीक्षेत घवघवीत यश मिळवत उजमा सलीम शेख हिने थेट पोलीस उपनिरीक्षक (झडख) पदाला गवसणी घातली आहे. नुकतेच प्रशिक्षण पूर्ण करून उजमा आष्टी नगरीत दाखल झाली असता तिच्या आगमनानिमित्त शहरात भव्यदिव्य स्वागत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक २५ डिसेंबर २०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता तिच्या निवासस्थानापासून शहरात मिरवणूक, फटाके, ढोल - ताशे, पुष्पवृष्टी व घोषणाबाजी करत आझाद नगर ग्रुपच्या वतीने तिचे भव्य स्वागत करण्यात आले. आष्टीकरांनी तिला डोक्यावर घेत आमची लेक पीएसआय झाली अशा अभिमानाने जल्लोष केला.

संघर्षाची प्रेरणादायी कहाणी

उजमाचा हा प्रवास सोपा नव्हता. वडिलांचे निधन ती अवघी चार वर्षांची असतानाच झाले. त्यानंतर तिच्या आईने एकटीने संसाराचा गाडा हाकत मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी खंबीरपणे उचलली. आई आष्टी येथील कन्या शाळेमध्ये शालेय पोषण आहारासाठी भात शिजवण्याचे काम करते. अत्यंत मर्यादित उत्पन्न, घरात अभ्यासासाठी योग्य वातावरण नाही, कुठलीही लायब्ररी नाही, अशी परिस्थिती असतानाही उजमाने हार मानली नाही.

लोक काय म्हणतील या भीतीपोटी तिने घरातील बाथरूमलाच आपली अभ्यासाची खोली बनवली. दिवसाला १६ ते १६ तास अभ्यास करत, अपार मेहनत घेत तिने पाच वर्षांच्या संघर्षानंतर यशाला गवसणी घातली. बारावीपासूनच तिला झडख होण्याचे स्वप्न होते. त्या स्वप्नासाठी तिने नियोजनबद्ध अभ्यास केला, योग्य मार्गदर्शन घेतले आणि अखेर चझडउ परीक्षेत यश संपादन केले.

आईच्या कष्टांना मिळाले फळ

आईच्या कष्टांची जाणीव ठेवून उजमाने प्रत्येक टप्प्यावर स्वतःला झोकून दिले. माझ्या आईसाठी काहीतरी मोठं करायचं हा तिचा ध्यास होता. आज तिच्या यशामुळे आईच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळत होते. वडील हयात नसतानाही एका सामान्य कुटुंबातील मुलगी झडख बनते, हे आष्टीसह संपूर्ण परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. प्रेरणादायी ठरणारी कहाणी

उजमाचा हा संघर्षमय प्रवास आज असंख्य मुलींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. परिस्थिती कितीही कठीण असली, तरी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास असेल तर यश नक्कीच मिळते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे उजमा शेख. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून



अभिनंदनाचा वर्षाव होत असून अनेक मान्यवरांनी तिला शुभेच्छा दिल्या आहेत. आष्टीची लेक झडख बनली, याचा अभिमान आज प्रत्येक आष्टीकराला आहे.

# वडीगोद्री येथे कै.पंढरीनाथ भाऊ शिसोदे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर

## ५ महिलांसह १०८ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग ;मानवतेचा संदेश देणारा उपक्रम

अंबड /प्रतिनिधी

तालुक्यातील वडीगोद्री येथील श्री गुरुदेव विद्या मंदिर येथे कै. पंढरीनाथ भाऊ शिसोदे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. श्री गुरुदेव विद्या मंदिर,शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान व शांताई बहुद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या शिबिरात ५ महिलांसह तब्बल १०८ रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तपणे रक्तदान करून समाजास प्रेरणादायी आदर्श घालून दिला.

कै. पंढरीनाथ भाऊ शिसोदे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी १ ते ७ जानेवारीदरम्यान सांस्कृतिक व क्रीडा सप्ताह साजरा केला जातो. या सप्ताहातील एक महत्त्वाचा समाजोपयोगी उपक्रम म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन





करण्यात आले होते. विशेष म्हणजे या शिबिरात महिलांचा लक्षणीय सहभाग पाहायला मिळाला असून, महिलांनी रक्तदान करून समाजात सकारात्मक संदेश दिला.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्राचार्या जे. डब्ल्यू. दांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी बोलताना त्यांनी सांगितले की आजच्या धकाधकीच्या जीवनात रक्तदान ही अत्यावश्यक गरज बनली आहे.अपघात गंभीर आजार व शस्त्रक्रियांच्या वेळी रक्ताची तातडीने आवश्यकता भासते. रक्ताला कोणताही पर्याय नाही. रक्तदानामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचतात तसेच रक्तदात्यांच्या आरोग्य तपासण्या होऊन आरोग्याबाबत जागरूकताही निर्माण होते असे सांगत त्यांनी उपस्थित रक्तदात्यांचे कौतुक केले.या उपक्रमाचे आयोजन शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष आर.व्ही. छल्लारे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.रक्तसंकलनाची जबाबदारी दत्ताजी भाले रक्तपेढी यांनी अत्यंत नियोजनबद्ध व यशस्वीरीत्या पार पाडली. रक्तसंकलनाच्या कार्यात कृष्णा कुलकर्णी, शीतल पवार,राधा पठाडे,आरती बामणे, नैना जाधव,ज्ञानेश्वर भालेकर, अनिता नांदरकर, दुर्गा वाघ, सखुबाई जाधव व सतीश वानोळे यांनी मोलाचे सहकार्य केले.

या रक्तदान शिबिराला ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी, युवक व सामाजिक कार्यकर्त्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. शिबिर यशस्वी करण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व रक्तदाते, आयोजक, वैद्यकीय पथक तसेच सहकार्य करणाऱ्या सर्वांचे उपस्थित मान्यवरांनी आभार मानले.





# वाढदिवसाचे औचित्य साधून, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

जाफराबाद /प्रतिनिधी

वाढदिवसाचा खर्च नाहकपणे करून उधळपट्टी करण्यापेक्षा हाच पैसा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यात उपयोगात आणून त्यांच्या गरजा पूर्ण केल्या तर विद्यार्थ्यांची शालेय गोडी वाढून त्यांच्या गरजा पूर्ण होवू शकतात. आपण ज्या गावात वाढलो,घडलो गावाचं काही देणं लागतो हा उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे पत्रकार हरिभाऊ भालके यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद शाळा विरखेडा भा.या ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून वाढदिवस साजरा केला.

यावेळी उपस्थित विरखेडा भा.जिल्हा परिषद शाळा चे मुख्याध्यापक श्री .दिवटे सर ,भोपळे सर माजी सरपंच विठ्ठल भालके (अटलजी) भाजपचे ज्येष्ठ नेते वसंतराव भालके,मा.फौजी शिवाजीराव भालके, भाजपा युवा नेते सदानंद भालके, ह.भ.प बाजीराव भालके (नाना) , राजेंद्र हिवाळे, मधुकरराव भालके तसेच शाळेतील सर्वच विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# पीएम श्री जि.प.माध्यमिक शाळा टाकळसिंगचे तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये अभूतपूर्व यश

आष्टी (राजेंद्र लाड)

तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा दिनांक ८ जानेवारी २०२६, गुरुवार रोजी श्री संत भगवान बाबा महाविद्यालय, आष्टी येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धांमध्ये पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, टाकळसिंग येथील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत अभूतपूर्व यश संपादन केले.

या स्पर्धांमध्ये प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करत तालुकास्तरावर प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावले. त्यामध्ये लांब उडी स्पर्धेत कुमारी प्रांजली काकासाहेब पुणेकर हिने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला, १०० मीटर धावणे स्पर्धेत चि. पृथ्वीराज विलास शिंदे याने तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावला, उंच उडी स्पर्धेतही कुमारी प्रांजली काकासाहेब पुणेकर हिने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून दुहेरी यश संपादन केले. कबड्डी (मुली - मोठा गट) संघाने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला, लगडी स्पर्धा (छोटा गट) मध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला, सांस्कृतिक कार्यक्रम (मुली - छोटा गट) मध्ये





तालुक्यात प्रथम क्रमांक, सांस्कृतिक कार्यक्रम (मुली - मोठा गट) मध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक, सांस्कृतिक कार्यक्रम (मुले - छोटा गट) मध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. एकूण ६४ विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून ८ स्पर्धांमध्ये हे यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, ग्रामपंचायत टाकळसिंगचे सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य, सभापती पंचायत समिती आष्टी, सर्व शिक्षणप्रेमी नागरिक, मार्गदर्शक, पालकवर्ग, तसेच टाकळसिंग, तवलवाडी, वाळुंज, पारगाव जोगेश्वरी, बळेवाडी, सांगवी, हिंगणी, दैठणा, हनुमंतगाव, चिखली, खानापूर, मंगरूळ आदी गावांतील पालक व माजी विद्यार्थ्यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला. याशिवाय पारगाव जोगेश्वरी केंद्राचे केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद

पान १ वरून...

**ना.चंद्रशेखरजी बावनकुळे ...**

सदिच्छा भेट दिली.

यावेळी आ.राजेश पवार व सौ. पुनम पवार यांनी नायगाव मतदारसंघ भाजप परिवार व पवार कुटुंबियांच्या वतीने महाराष्ट्राचे श्रद्धास्थान विठ्ठल-रुक्मिणी यांची मूर्ती देऊन त्यांचे हृद्यस्वागत केले.नायगाव विधानसभा मतदारसंघासह नांदेड जिल्ह्यातील विविध विकासात्मक बाबींवर तसेच अनेक विषयांवर यावेळी सकारात्मक चर्चा झाली. नेहमीप्रमाणे आदरणीय श्री. बावनकुळे साहेबांची ही भेट ऊर्जादायी व मार्गदर्शक अशीच होती.

**जालन्यात नागरिकांसाठी...**

पासपोर्ट पडताळणी शस्त्र परवाना पडताळणी सभा,मिरवणूक व कार्यक्रम परवानगी ध्वनी प्रदूषणासंदर्भातील तक्रारी वाहतूक कोंडी व वाहतूक विषयक अडचणी वाहतूक चलानबाबत तक्रारी इतर नागरी समस्यांबाबत तक्रारी नागरिकांनी या सुविधेचा योग्य व जबाबदारीने वापर करून आपल्या तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.प्राप्त तक्रारींची तात्काळ दखल घेऊन नियमांनुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल असे पोलिस अधीक्षक जालना यांनी स्पष्ट केले आहे.नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व सेवा अधिक सक्षम करण्यासाठी जालना पोलिस दल सदैव तत्पर असल्याचा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला आहे.

**मोटारसायकल चोरी ...**

या प्रकरणी जालना शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सदर बाजार पोलीस ठाणे जालना येथे सुरू आहे.

ही कारवाई मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश डबले, सचिन धामणकर तसेच पोलीस कर्मचारी राजेंद्र वाघ, संजीव ढोरे, योगेश मोरे, राकेश राठोड, गणेश लांडे, प्रमोद शिंदे, संदीप पाटील, सचिन श्रीखंडे, रमेश बागुल, किशोर पंडित, कैलास चव्हाण, अक्षय जाधव आदींच्या पथकाने यशस्वीरीत्या केली.

**माजलगाव तालुक्यात ....**

अधिकारी माजलगाव यांनी चौकशी पूर्ण केल्या नंतर पोलीस अधीक्षक बीड यांनी त्यांना दि.२९.१२.२०२५ रोजी त्यांचे म्हणने मांडण्यास संधी देऊन व त्यांचे टोळीवरील गुन्हे, लोकांमधील दहशत, त्यांची गुन्हेगारी पार्श्वभुमी पाहुन, गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी व सदर टोळीची पांगा-पांग करणे साठी सदर टोळीस बोड, परभणी व जालना या तीन जिल्हयाचे कार्यक्षेत्रातुन महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे दोन वर्षे कालावधीसाठी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी आज दि.०९.०१.२०२६ रोजी आदेश पारीत करुन हद्दपार केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधिक्षक श्रीमती चेतना तिडके, उप विभागीय पोलीस अधिकारी श्री. शैलेश गायकवाड, पोनि श्री. राहुल सुर्यतळ, पो. स्टे माजलगाव शहर स्थानिक गुन्हे शाखा बीड चे पो.नि. श्री. शिवाजी बंटेवाड, सपोउपनि अभिमन्यु औताडे, पोह-महादेव बहीरवाळ पोह- बागवान पोशि- बिबिसेन चव्हाण यांनी केली आहे. भविष्यातही बीड जिल्हयात टोळीने गुन्हे करणारे गुन्हेगारा विरुध्द व गुंडा विरुध्द कठोर भुमीका घेवुन चझऊ-, चउजउ- तसेच हद्दपार अशा कारवाया करण्याचे संकेत पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी दिले आहेत.

पान १ वरून...

**नैसर्गिक अनुदान...**

तालुक्यांतील आपल्या नातेवाईकांची नावे पुरवून लाखो रुपयांचे बोगस अनुदान मिळवून देण्यात सक्रीय भूमिका बजावणारा एजंट सुरेश गिरधार नागलोत वय ४४,रा.धनगर पिंपळगाव ता.अंबड याचा सहभाग उघडकीस आला.

त्यानुसार आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने मौजे धनगर पिंपळगाव येथून सुरेश नागलोत यास अटक केली असून या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या आता १३ वर पोहोचली आहे.दरम्यान, या घोटाळ्यातील फरार आरोपी व त्यांच्या एजंटांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे.

ही प्रभावी कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री.अजयकुमार बन्सल,अपर पोलीस अधीक्षक श्री.आयुष नोपाणी,प्रभारी पोलीस उपअधीक्षक श्री. सिद्धार्थ माने यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.मिथुन घुगे तसेच पोलीस अंमलदार गोकुळसिंग कायटे,समाधान तेलंग्रे,किरण चव्हाण,अंबादास साबळे, गजानन भोसले,सागर बावीस्कर,दत्ता वाघुंडे, विष्णू कोरडे,ज्ञानेश्वर खुने,रविंद्र गायकवाड,शुभम तळेकर, श्रेयस वाघमारे,चालक पाठक मेजर, महिला अंमलदार जया निकम, निमा घनघाव,मंदा नाटकर यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

**बीड जिल्हा परिषदेत...**

विभाग असेल जलसिंचन विभाग असेल पाणीपुरवठा विभाग असेल स्वच्छता विभाग असेल असे अनेक विभाग आजही इमारतीच्या बाहेर आहे. या इमारतीमध्ये लिफ्टची व्यवस्था नाही. ज्या पायऱ्या उभारण्यात आले आहेत त्या पायऱ्यांच्या बाजूला दिव्यांगाना जाण्यासाठी स्वतंत्र सुविधायुक्त असलेला रस्ता नाही. त्यामुळे दिव्यांगांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा इतर विभागात जायचे असेल तर त्रासदायक पायऱ्या चढून जावे लागते. दिव्यांगांचा हा त्रास कमी करण्यासाठी किमान संवेदनशील असलेल्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांनी आठवड्यातून ज्या दोन बैठका सोमवार आणि शुक्रवारी घेतल्या जातात त्या बैठका खाली ग्राउंड फ्लोअर मध्ये घेऊन दिव्यांगांना होणारा त्रास कमी करावा अशी अपेक्षा आहे.





# कौशल्याभिमुख शिक्षण काळाची गरज- उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये

माजलगाव /प्रतिनिधी : सध्याच्या स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी पारंपारिक शिक्षणाबरोबरच कौशल्यावर आधारित शिक्षणाची गरज आहे. आज ६५ टक्के नोकऱ्या या कौशल्यावर आधारित देण्यात येत आहेत, त्यामुळेच कौशल्य आधारित शिक्षण ही काळाची गरज आहे, यासाठी विविध कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन डॉ. युवराज मुळये यांनी केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर व श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष युवक युवती शिबिर मौजे साळेगाव येथे संपन्न होत आहे. या शिबिराच्या दुसऱ्या दिवशीच्या चौथ्या सत्रामध्ये ते शिक्षणासाठी या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी देवगिरी अर्बन चे चेअरमन दीपक कदम हे तर इतिहास विभाग प्रमुख डॉ. गोरक्षनाथ फसले उपस्थित होते.बोलतांना डॉ. गोरक्षनाथ फसले यांनी शिक्षणाचे मानवी जीवनातील महत्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शिवशंकर मिटकरी यांनी केले तर आभार प्रा. अशोक होके यांनी मानले. कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी व ग्रामस्थ उपस्थित होते.



# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी पाटण येथे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त बालिका दिन उत्साहात साजरा

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील डोईठाण केंद्रांतर्गत असलेल्या सांगवी पाटण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याची उज्ज्वल परंपरा जपणाऱ्या या शाळेतील कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीच प्रमुख भूमिका साकारत कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

यावेळी अनेक विद्यार्थी सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतीबा फुले यांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंचा पाळणा, प्रभावी भाषणे, चारोळ्या तसेच त्यांच्या जीवनावर आधारित गीतांवर मनमोहक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर ग्रामस्थांनी शाळेतील शिक्षिका व गावातील महिलांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त सन्मान केला.या कार्यक्रमात वक्त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकताना, त्यांनी स्त्रीशिक्षणासाठी केलेल्या संघर्षाचे आणि समाजपरिवर्तनातील ऐतिहासिक योगदानाचे महत्त्व विशद केले. त्या काळात लावलेल्या शिक्षणाच्या रोपाचा आज वटवृक्ष झाला आहे, असे प्रेरणादायी मार्गदर्शन सरपंच दत्तात्रय खोटे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले, उपाध्यक्षा श्रीम. राणी राऊत, सदस्य श्रीम. निलम दाणी, लक्ष्मण कर्डिले, रवि भोसले, श्रीम. खाकाळ मॅडम, पोटे सर, देशमुख सर, श्रीम. रजपूत मॅडम व समाजसेवक समीर शेख यांनी केले.

कार्यक्रमातील दोन विशेष घटनांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पालक लक्ष्मण कर्डिले यांनी सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा शाळेस भेट दिली. तसेच सांगवी पाटण येथील समाजसेवक समीर शेख यांना मिळालेल्या राज्यस्तरीय 'गंगाई – बाबाजी आदर्श समाजसेवक' पुरस्काराबद्दल शाळेच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शिवरायांचा मुस्लिम मावळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समीर शेख यांच्या सामाजिक कार्याचा हा गावकऱ्यांनी केलेला गौरव होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मच्छिंद्रनाथ देशमुख सर यांनी केले, तर प्रस्तावना बाळासाहेब पोटे सर यांनी मांडली. आभार प्रदर्शन श्रीम. रजपूत मॅडम यांनी केले. या कार्यक्रमास सरपंच दत्तात्रय खोटे, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले, राजू भोसले, सद्दाम शेख, फारुख शेख, अन्सार शेख, लक्ष्मण कर्डिले, रवी भोसले, श्रीरंग कांबळे, मुख्याध्यापक तुकाराम बोराडे, मच्छिंद्रनाथ देशमुख सर, साखरे सर, बाळासाहेब पोटे सर, श्रीम. खाकाळ मॅडम, श्रीम. रजपूत मॅडम, सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षणप्रेमी नागरिक तसेच मोठ्या संख्येने महिला भगिनी व पालक उपस्थित होते.

---

## तहसील कार्यालय, कळंब
## जाहीर प्रगटन

समस्त गावकरी शिराढोण ता कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण यांचेमार्फत श्री जुबेर मुक्तार शेख रा. शिराढोण ता कळंब जि. धाराशिव यांनी त्यांची मुलगी महेक जुबेर शेख यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव मौ शिराढोण ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा मौजे शिराढोण ता कळंब जि. धाराशिव या ठिकाणी दि. १५/०४/२०१९ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण यांनी दि. २५/०८/२०२५ रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/–**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

---

**जाहीर प्रगटन**
**ॲड. ए.एल गरूड**
**श्रीमती. वंदना व्ही. जोशी दिवाणी न्यायाधीश व स्तर बीड यांचे न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक :– १८६८/२०२५**
**संभाजी पि. मधुकर लोंढे व ईतर वि. निरंक**

अर्जदार:–

१. संभाजी पि. मधुकर लोंढे, वय ३९ वर्षे, धंदा–नोकरी, रा. कोळगाव, ता. गेवराई, जि. बीड.

२. सिमा भ्र. बप्पासाहेब शेळके, वय ४२ वर्षे, धंदा–घरकाम, रा. पुरुषोत्तमपुरी, ता. माजलगाव, जि. बीड.

३. सुलभा संदिपान पवार, वय ४१ वर्षे, धंदा–घरकाम, रा. कोळी सिरसगाव, ता. अंबड, जि. जालना.

४. वर्षा भ्र. गणेश घोरपडे, वय ४० वर्षे, धंदा–घरकाम, रा. शिंगवे, ता. साकारवाडी, ता. राहाता, जि. अहमदनगर.

सर्व जनतेस या जाहीर प्रगटन नोटीसव्दारे कळविण्यात येते की, या न्यायालयामध्ये वरील अर्जदार क. १ ते ४ हे मयत नामे नंदाबाई मधुकर लोंढे यांचे मुले व मुली आहेत. अर्जदारांचे वडील व मयताचे पती नामे मधुकर लोंढे हे यापुर्वीच मयत झालेले आहेत.

असे की मयत नामे नंदाबाई मधुकर लोंढे यांचा दिनांक १५/०२/२०२५ रोजी कासलीवाल मारवेल वेस्ट, छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत.

त्याचे वारस असल्या बाबत दिवाणी न्यायालय क.. स्तर, गेवराई या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज क. ५०९/२०२५, संभाजी मधुकर लोंढे वि. निरंक हा अर्ज दिनांक १५/०९/२०२५ रोजी निकाली काढण्यात आला. त्यानंतर उपरोक्त अर्जदाराने मा. दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड येथे कलम ३७२ भारतीय वारसा हक्क कायदा नुसार वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज केला आहे. मयाताचे पश्चात सदर वरील अर्जदार हे कायदेशीर वारस असुन त्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही.

परिशिष्ट

| अ. क्र. | मयत खातेदारांचे नाव व पत्ता | मयत खातेदाराच्या नावे शिल्लक असलेली रक्कम | मयत खातेदाराचा खाते नंबर व बँकेचे नांव |
|---|---|---|---|
| १ | नंदाबाई मधुकर लोंढे | रु. ८,५४,९७४.११/– (आठ लाख चोप्पन्न हजार नऊशे चौ-याहत्तर रुपये अकरा पैसे) व त्या खात्यावर आजतागायत मिळणारे व्याज. | महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा कोळगाव, ता. गेवराई, जि. बीड. खाते क्रमांक ५४५२३००२६३१ |

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१७३३ दि.३१.१२.२०२५**
## जाहिर प्रगटन
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सचिन संतोष शिंदे रा.साडेगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सचिन संतोष शिंदे | स्वतः | १६.०६.२००२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– ३१/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

## टी.सी हरवली आहे

कु. नंदा बापुराव पिवळ रा.आडुळ ता.पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर या नावाची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आडुळ ची इयत्ता ९ नववी पासची टी सी आडूळ ते अंबड प्रवासादरम्यान हरवली आहे.

कोणास सापडल्यास या नंबर वर संपर्क ९७६५८६५४८३ साधावा

---



# नरेंद्र महाराज संस्थानच्या जीवनदान महाकुंभात १३१ जणांचे रक्तदान

तळणी /वार्ताहर

रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या प्रेरणेतून राबविण्यात येणाऱ्या जीवनदान महाकुंभ २०२६ अंतर्गत मंठा तालुक्यातील तळणी येथे गुरुवारी (ता. ८ जानेवारी) आयोजित रक्तदान शिबिरात १३१ रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

जनकल्याण रक्तकेंद्राच्या सहकार्याने हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ ते १८ जानेवारीदरम्यान राज्यभर १५ दिवस चालणाऱ्या जीवनदान महाकुंभाच्या माध्यमातून गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना विनामूल्य रक्तपुरवठा करण्याचा उपक्रम संस्थानच्या वतीने राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने तळणी येथे हे शिबिर घेण्यात आले.

महाराष्ट्रात सिकलसेल, ॲनिमिया, हिमोफिलिया, रक्ताचा कर्करोग तसेच किडनी फेल्युअरसारख्या आजारांचे प्रमाण वाढत असून अशा गंभीर आजारांशी झुंज देणाऱ्या रुग्णांसाठी वेळेवर रक्त उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. रक्ताच्या प्रत्येक थेंबातून एखाद्याचा जीव वाचू शकतो, ही भावना केंद्रस्थानी ठेवून संस्थानच्या वतीने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी विष्णु उबाळे, सोमनाथ सोनुने, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सचिन सरकटे, अंकुश हानवते, आसाराम राऊत, नंदु पाटील यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे आयोजकांनी आभार मानले. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

---

**कार्यालय नगरपंचायत तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, तीर्थपुरी**
**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार : सुरेखा ज्ञानेश्वर मडके रा.तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना यांनी गट नं.(–) सिटी सर्वे नं. (–) ग्रा.प. कालिन नगरपंचायत मिळकत क्र. ३९७९ क्षेत्र २०९९.५९ चौ.फु. पैकी १०५० चौ.फु. जागा नामे योगेश बाबुराव गर्जे रा.तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर खरेदीखत खरेदीखत दस्त क्र. ६६६४/२०२५ दि. ११/१२/२०२५ अन्वये खरेदी केली आहे.

खरेदी खरेदीखत सत्य प्रत जोडुन आवक क्र. (३३७१) दिनांक २६/१२/२०२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेंव्हा योगेश बाबुराव गर्जे रा.तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना यांच्या नावावर असलेले गट नं.(–) सिटी सर्वे नं. (–) ग्रा.प. कालिन नगरपंचायत मिळकत क्र. ३९७९ क्षेत्र २०९९.५९ चौ.फु. पैकी १०५० चौ.फु. म्हणजेच ९७.५८ चौ.मी. ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व : चांडक कुटुंबाची जागा
पश्चिम : खरेदीदार यांची जागा
दक्षिण : रस्ता
उत्तर द्या : अमृत मिठूलाल सारडा

या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र ९७.५८ चौ. मी. जागा खरेदीखत पत्रा आधारे नामांतर करणे बाबत काही उजर / आक्षेप/ तक्रार असल्यास सदर जाहिरप्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचे काहीही म्हणने नाही. असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत मुख्याधिकारी**
**नगर पंचायत तीर्थपुरी**

---

# 'विकसित भारत २०४७' विषयावरील बहुविद्याशाखीय परिषद बनसारोळ्यात उत्साहात संपन्न




आष्टी (प्रतिनिधी)

बनसारोळा येथील जनविकास महाविद्यालयात 'विकसित भारत २०४७ : स्वातंत्र्याच्या १०० वर्षांकडे भारताची वाटचाल' या विषयावर एकदिवसीय बहुविद्याशाखीय परिषद नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. परिषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य तथा कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते.

परिषदेचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व लखणी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. सर्जेराव निमसे यांच्या हस्ते झाले. उद्घाटनपर भाषणात त्यांनी 'विकसित भारत २०४७' हे व्हिजन साकार करण्यासाठी देशाला आधुनिक पायाभूत सुविधा, रोजगारनिर्मिती, कृषी क्षेत्रातील सुधारणा, शिक्षणव्यवस्थेचे बळकटीकरण, सशोधन व विकास, नवोपक्रम, सामाजिक प्रगती तसेच हवामान बदलासारख्या आव्हानांवर मात करावी लागेल, असे प्रतिपादन केले. विकसित राष्ट्रांच्या धर्तीवर अमूलाग्र बदल आवश्यक असून समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊनच हे स्वप्न साकार होऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी 'विकसित भारत २०४७' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देशातील शिक्षणव्यवस्था आणि सध्या राबविले जाणारे एनईपी–२०२० धोरण महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असे मत व्यक्त केले.परिषदेत विविध सत्रांच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गौतम पाटील (सदस्य, स्थानिक व्यवस्थापन परिषद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ), प्राचार्य डॉ. अजय पाटील (सुशीलादेवी देशमुख महाविद्यालय, लातूर), प्राचार्य गोरोबा खुरपे (कला–वाणिज्य महाविद्यालय, मायणी, जि. सातारा) आणि डॉ. वैशाली अहिर (इंग्रजी विभाग प्रमुख, सरस्वती महाविद्यालय, केज) यांनी मार्गदर्शन केले. त्यांनीही 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेवर आपापली मते मांडली.

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५/२०२६**
रामकिसन उत्तम बांडे व इतर वि. निरंक
**( मार्फत – ॲड. ठोसर बी.व्ही., गेवराई)**

अर्जदार – १. रामकिसन पि. उत्तम बांडे, वय ४७ वर्षे, धंदा – शेती, रा. उमापुर, ता. गेवराई जि. बीड.

२. संभाजी पि. उत्तम बांडे, वय ४५ वर्षे, धंदा – शेती, रा. उमापुर, ता. गेवराई जि. बीड.

३. संदिप पि. उत्तम बांडे, वय ४२ वर्षे, धंदा – शेती, रा. उमापुर ता. गेवराई जि.बीड.

ज्याअर्थी मयत उत्तम पि. विठोबा बांडे, रा. उमापुर, ता. गेवराई जि. बीड दिनांक ३०/०७/२०२५ रोजी मौजे रा. उमापुर, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ ते ३ यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वाग्स प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत उत्तम पि. विठोबा बांडे, रा. उमापुर, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०७/०१/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः– १०/०२/२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २७/२०२६**
पार्वती भ्र. शेषराव मासाळ आणि इतर वि. निरंक
**(मार्फत– ॲड. ए.एस. पंडित, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे सुंदर पु. शेषराव मासाळ हे/हया दिनांक १७/१२/२०२५ रोजी महावीर हॉस्पिटल बीड ता. जी. बीड, अर्जदार क्र. १ पार्वती भ्र. शेषराव मासाळ, वय ७६ वर्षे,धंदा–घरकाम, रा.ईट्कुर ता.गेवराई जि.बीड,अर्जदार क्र. २ आशा भा. सुंदर मासाळ, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा.ईटकुर ता.गेवराई जि.बीड ह.मु.उत्तमनगर विहोळी नाशिक, अर्जदार क्र. ३ मयूर पि.सुंदरराव मासाळ, वय २४ वर्ष, व्यवसाय हा शेती आहे रा.ईटकूर ता. गेवराई जि.बीड ह.मु. उत्तमनगर विहोळी नाशिक, अर्जदार क्र. ४ मयुरी पी. सुंदरराव मासाळ, वय २४ वर्षे, यांचा व्यवसाय शेती आहे. रा.ईटकूर ता. गेवराई जि.बीड ह.मु. उत्तमनगर विहोळी नाशिक यांनी सरकारी/निमसरकारी कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्यांनी मुंबई नियमन कायद्याच्या कलम २ नुसार किंवा न्यायालयासमोर वारसा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सुंदर पि. शेषराव मासाळ यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ०८/०१/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख – १६/०२/२०२५

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०१७/२०२५**
कुसूमबाई भ्र.बबनराव सोलाट व इतर वि.निरंक
**(मार्फत–ॲड.आर.एल.गवारे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **बबनराव पि.विनायकराव सोलाट, रा.गौंडगांव ता.गेवराई जि.बीड हे दि.२०.११.२०२५ रोजी रा.गौंडगांव ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.कुसूमबाई भ्र.बबनराव सोलाट, वय–७८ वर्षे, धंदा–शेती, रा.गौंडगांव ता.गेवराई जि.बीड, २.सुरेश पि.बबनराव सोलाट, वय–६१ वर्षे, धंदा–शेती, रा.गौंडगांव ता.गेवराई जि.बीड, ३. सुनिल पि.बबनराव सोलाट वय–५८ वर्षे, धंदा–शेती, रा.गौंडगांव ता.गेवराई जि.बीड ह.मु.जालना ता.जि.जालना** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **बबनराव पि.विनायकराव सोलाट, रा.गौंडगांव ता.गेवराई जि.बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१७/१२/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –२८/०१/२०२६**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–९०० दि.०७.१०.२०२५**
## जाहिर प्रगटन
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अनिल मल्हारी नवखडे, रा.अंकुश नगर, महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | तनुजा अनिल नवखंडे | मुलगी | ०१.११.२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– ०७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१६५३ दि.३१.१२.२०२५**
## जाहिर प्रगटन
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अब्दुल नबी शमशोद्दीन शेख, रा.दुनगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **चुलती** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मासुमबी आजमोद्दीन शेख | चुलती | १७.०२.२०१७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– ३१/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१००७/२०२५**
मोहिद्दीन विरुध्द निरंक
**(मार्फत–ॲड.ढोबळे एस.एस.)**

ज्याअर्थी मयत नामे **बक्षन पि.राजेशहा पठाण वाघवाले हे दि.१९.०८.१९९७ रोजी चकलांबा ता.गेवराई जि.बीड तसेच बादशहा पि.बक्षन पठाण हे दि.०३.१२.२०२३ रोजी वडजी ता.औसा जि.लातुर** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.मोहीद्दीन पि.बादशाह पठाण वय–३८ वर्षे, धंदा–शेती, रा.चकलांबा ता.गेवराई जि.बीड ह.मु.वडजी ता.औसा जि.लातुर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **बक्षन पि.राजेशहा पठाण वाघवाले, बादशहा पि.बक्षन पठाण** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.–/–/–** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –२३/०१/२०२६**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# भोंगा वाजला की अभ्यास सुरु : अंभोरा गावात विद्यार्थ्यांसाठी अभिनव उपक्रम



आष्टी (राजेंद्र लाड)

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अंभोरा येथे एक अभिनव आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात येत आहे. दररोज संध्याकाळी ठराविक वेळी भोंगा वाजताच गावातील विद्यार्थी टीव्ही, मोबाईल, खेळ व इतर व्यत्यय बाजूला ठेवून किमान दोन तास नियमित अभ्यासासाठी बसतात. 'भोंगा वाजला की अभ्यास सुरू' ही अंभोरा शाळेची नवी ओळख बनली आहे.

हा उपक्रम जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, अंभोरा, ग्रामपंचायत आणि शाळा व्यवस्थापन समिती यांच्या संयुक्त पुढाकारातून सुरू करण्यात आला असून तो गेल्या दीड महिन्यांपासून यशस्वीपणे राबविला जात आहे. भोंगा वाजल्यानंतर संपूर्ण गावात अभ्यासासाठी अनुकूल आणि शांत वातावरण निर्माण होते. घराघरांतून वही, पुस्तकांचा आवाज, वाचन व लेखनाची लगबग पाहायला मिळते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नियमित अभ्यासाची सवय लागली असून त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा होत आहे. भोंगा वाजल्यानंतर अभ्यास करणे ही आता रोजची शिस्त बनली आहे. पालकही या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देत असून, ते मोबाईल व टीव्हीचा वापर मर्यादित ठेवून मुलांना अभ्यासासाठी प्रोत्साहन देत आहेत. काही पालक स्वतः मुलांसोबत बसून धडे समजावून सांगत असल्याने घरगुती अभ्यास संस्कृतीला चालना मिळत आहे.

शिक्षकवर्गाच्या मते, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, वेळेचे नियोजन, एकाग्रता आणि आत्मविश्वास वाढत आहे. नियमित अभ्यासामुळे वाचनगती, लेखनातील सुस्पष्टता आणि गणिती कौशल्ये सुधारत असून परीक्षेतील कामगिरीतही सकारात्मक बदल दिसून येत आहेत. डिजिटल व्यसनांपासून दूर राहण्याची सवय लागणे हा या उपक्रमाचा मोठा फायदा असल्याचे शिक्षकांचे मत आहे. संध्याकाळी ६ वाजता मुले अभ्यासाला बसतात आणि ८ वाजता अभ्यास पूर्ण करतात. हा उपक्रम शिक्षिका श्रीम. अनामिका शिदे यांच्या संकल्पनेतून साकार झाला असून, शालेय समिती, ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी यास संमती देत ठराव मंजूर केला आहे. भोंगा वाजविण्याची जबाबदारी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांकडे देण्यात आली आहे, अशी माहिती मुख्याध्यापक अशोक शिंदे यांनी दिली. ग्रामपंचायत व शाळा व्यवस्थापन समितीच्या समन्वयामुळे व शाळेतील शिक्षक शिवाजी खुडे, अण्णासाहेब घोडके, शफीक खान, संतोष पवार, श्रीम. कविता सोनवणे यांच्या सहकार्याने हा उपक्रम प्रभावी ठरत असून, पालकसभा, मार्गदर्शन शिबिरे आणि प्रोत्साहनात्मक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. गावकऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम आता सामाजिक चळवळीचे स्वरूप घेत असून, कमी साधनांतून शिक्षणाचा दर्जा उंचावणारे अंभोरा शाळेचे हे यशस्वी मॉडेल ठरत आहे.

# बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा आष्टी तालुक्याचा दौरा

जनतेच्या समस्या ऐकून तात्काळ कार्यवाहीचे निर्देश

आष्टी (प्रतिनिधी)

मा. श्री. विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी, बीड यांनी शुक्रवार दि. ९ जानेवारी २०२६ रोजी पाटोदा व आष्टी तालुक्याचा दौरा करून विविध ठिकाणी पाहणी केली तसेच तहसील कार्यालयात आढावा बैठका घेतल्या. दौऱ्याची सुरुवात पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड, चिंचोली येथे होणाऱ्या ह. भ. प. संत वामनभाऊ महाराज यांच्या ५० व्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्याच्या सांगता कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेऊन करण्यात आली. दि. १० जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या कार्यक्रमास मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नियोजित उपस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी सकाळी ११ वाजता प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

यानंतर त्यांनी आष्टी तालुक्यातील मौजे खुंटेफळ येथील साठवण तलाव प्रकल्पास भेट देऊन पाहणी केली. प्रकल्पग्रस्त गावातील नागरिकांशी चर्चा करून त्यांच्या समस्या व मागण्या ऐकून घेतल्या. दुपारी २.३० ते ५.०० या वेळेत तहसील कार्यालय, आष्टी येथे जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते.




यावेळी तालुक्यातील नागरिकांकडून एकूण ७३ अर्ज स्वीकारण्यात आले. विविध विभागांशी संबंधित प्रश्नांवर तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

सायंकाळी ५ वाजता आष्टी, पाटोदा व शिरूर कासार तालुक्यातील सर्व बँकर्स व तालुका कृषी अधिकारी यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. या बैठकीत मुद्रा कर्ज व इतर वित्तीय योजनांचा आढावा घेऊन लाभार्थ्यांना तत्काळ लाभ मिळावा, यासाठी बँक प्रमुखांना स्पष्ट निर्देश देण्यात आले. यानंतर सायंकाळी ६ वाजता सर्व मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांची आढावा बैठक झाली. यामध्ये अधिकारी मुख्यालयी उपस्थित राहणे, प्रलंबित फेरफार वेळेत निकाली काढणे, ई-सेवा मित्र अँपद्वारे दर आठवड्याला किमान १० प्रमाणपत्रांचे वितरण करणे, शेती रस्ते व पाणंद रस्त्यांची कामे शासन नियमांनुसार पूर्ण करणे आदी सूचना देण्यात आल्या. तसेच घरकुल योजनेसाठी तालुक्यात १४ वाळूघाट निश्चित करण्यात आले असून लाभार्थ्यांना नियमानुसार वाळू उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहितीही जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. १५ दफनभूमी प्रस्ताव गटविकास अधिकाऱ्यांकडून मागवून तात्काळ सादर करण्याचे आदेशही त्यांनी दिले. या दौऱ्यामुळे तालुक्यातील प्रशासकीय यंत्रणेला गती मिळाल्याचे चित्र दिसून आले.

## उंद्री (प.दे.) येथील विजयकुमार व्यंकटराव वादे उंद्रीकर यांची राष्ट्रीय कुंभार महासभेच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी निवड



मुखेड /प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे एक समाजाभिमुख व्यक्तिमत्व विजयकुमार व्यंकटराव वादे यांची रविवार दि.१/१/२०२६ डिसेंबर २०२६ गुरूवार रोजी राष्ट्रीय कुंभार महासभेच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी निवड करण्यात आली आहे.

प्रजापती समाजाच्या विकास प्रवासात समाजसेवेचे कार्य, वचनबद्धता, करुणा आणि सर्वोत्तम आदर्श लक्षात घेऊन विजयकुमार वादे हे महासभेच्या या महत्त्वाच्या पदाचीही जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडतील आणि राष्ट्रीय कुंभार महासभेचे उच्च उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी पूर्ण सहकार्य करून राष्ट्रीय प्रजापती समाजाच्या विकासगाथेतील शिक्षणाच्या आणि अनुभवाच्या आधारे समाजाला चांगले नेतृत्व देतील या विश्वासाने विजयकुमार व्यंकटराव वादे यांची राष्ट्रीय कुंभार महासभेच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव २०२६ ते २०२८ या ३ वर्षांसाठी निवड करून कुंभार महासभेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष- गजाननराव व्यंकटराव कोलमकर कुंभार महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष-दीपचंद प्रजापती, राष्ट्रीय मुख्यमहासचिव- डुंगरमल प्रजापत, राष्ट्रीय कार्यकारणी अध्यक्ष- सुग्रीव पंडित, राष्ट्रीय मुख्य संरक्षण- वीरचंदभाई एस.प्रजापती यांच्या वतीने रविवार दि.१ डिसेंबर रोजी आपल्या स्वाक्षरीचे नियुक्ती पत्र विजयकुमार वादे यांना देण्यात आले.

विजयकुमार वादे हे भानुदास माळी यांच्या ओबीसी सेलचे नांदेड सरचिटणीस आहेत अशा विविध सामाजिक संघटनेमध्ये कार्य करण्याचा अनुभव असुन सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी अग्रेसर आहेत यामध्ये हे हिरारीने सहभाग असतो या सर्व जबाबदाऱ्या पाडतच सध्या शैक्षणिक क्षेत्राच्या माध्यमातून कार्य करीत आहेत.

वरील पदावर कार्य करीत असतांनाच स्वतःच्या प्रपंचामध्ये व्यस्त न राहता ते समाज सेवेला प्राधान्य देऊन ते फक्त आपल्या समाजातीलच नव्हे तर कोणत्याही अन्यायग्रस्त समाजातील प्रत्येक घटकांच्या समस्या जाणून घेऊन त्या समस्या सोडवून न्याय देण्यामध्ये सदैव व्यस्त राहतात त्यांच्या ठायी असलेल्या एका निर्भीड व प्रामाणिक समाज सेवकाच्या गुणाची दखल घेऊन त्यांची राष्ट्रीय कुंभार महासभेच्या महाराष्ट्र प्रदेशसचिव पदी निवड करण्यात आली असून या निवडीबद्दल विजयकुमार वादे यांना संबंध महाराष्ट्र राज्यातील सर्व स्तरातून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# तळणीतील पत्रकारांचे जिल्हाभरात नाव अभ्यासू पत्रकारितेचे कौतुक - शरद पाटील

## दर्पणदिनानिमित्त मंठा ग्रामीण को-ऑफ क्रेडिट सोसायटीच्या वतीने पत्रकारांना दोन लाखांचे विमा कवच

तळणी /वार्ताहर :तळणी येथील पत्रकार हे केवळ परिसरापुरते मर्यादित नसून त्यांच्या कार्याची दखल संपूर्ण जिल्हाभर घेतली जाते. अभ्यासू, वस्तुनिष्ठ आणि समाजाभिमुख पत्रकारिता करणारे पत्रकार तळणी परिसरात कार्यरत आहेत, हे निश्चितच अभिमानास्पद आहे. अशा पत्रकारांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे तालुका उपाध्यक्ष शरद पाटील यांनी केले.

तळणी येथे मंठा ग्रामीण को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वतीने आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले, या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दर्पणदिनानिमित्त



आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात ग्रामीण पत्रकारितेच्या योगदानाची विशेष दखल घेण्यात आली.

यावेळी मंठा ग्रामीण को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वतीने संचालक नितीन सरकटे यांनी तळणीतील पत्रकारांना दर्पणदिनानिमित्त सलग दुसऱ्या वर्षी ग्रामीण पत्रकारांसाठी दोन लाख रुपयांचे विमा कवच प्रदान करून पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.

ग्रामीण भागात बातमी संकलन करताना विविध अडचणी व धोके संभवतात; त्या पार्श्वभूमीवर पत्रकारांना संरक्षण मिळावे, या उद्देशाने ही विमा पॉलिसी देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.ग्रामीण पत्रकारितेला प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम असल्याचेही त्यांनी नमूद केले.

नितीन सरकटे,संचालक

मंठा ग्रामीण को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी

कार्यक्रमाला सरपंच गौतम सदावर्ते, उपसरपंच विश्वनाथसिंग चंदेल,सरपंच सुनील कांगणे, भगवान देशमुख, नारायण सरकटे,डॉ. रवींद्र देशमुख, विष्णु सोळंके,केशव नाईक, दारासिंग चंदेल, सतीश सरकटे, शिवाजी खरात,यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित पत्रकार ज्येष्ठ पत्रकार केशव येऊल, अरुण राठोड, अमोल राऊत, रवी पाटील, नाना राजपूत यांच्यासह बँकेचे अधिकारी-कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी पत्रकारांना दर्पणदिनाच्या शुभेच्छा देत त्यांच्या निर्भीड व समाजहिताच्या कार्याचे कौतुक केले. सूत्रसंचालन सतीश सरकटे यांनी केले



# सावरकरच्या ग्रंथालयाद्वारा वाचन कौशल्य कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

मी काय वाचू ? आणि कसे वाचू ? या विषयावर गौरी डावखरे यांचे मार्गदर्शन

बीड /प्रतिनिधी

येथील स्वा. सावरकर महाविद्यालयाच्या ग्रंथालया मार्फत वाचन संकल्प महाराष्ट्राचा मध्ये मातोश्री माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वंजारवडी येथे वाचन कौशल्य कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.मी काय वाचू ?आणि कसे वाचू ? या विषयावर गौरी डावखरे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि शाळेचे विद्यार्थी यांच्या सहभागाने ग्रंथदिंडी काढण्यात आली. प्रमुख अतिथी गौरी डावखरे, मुख्याध्यापक बी डी नागरगोजे आणि रासेयो च्या कार्यक्रमाधिकारी यांच्या उपस्थितीत ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात मुख्याध्यापक श्री नागरगोजे बी. डी. म्हणाले की अशा प्रकारच्या उपक्रमांमधून एक चांगला वाचक घडतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशा उपक्रमातून वाचनास नक्कीच प्रोत्साहन मिळेल, त्यांनी महाविद्यालयाचे उपक्रमा बद्दल कौतुक केले.वाचन कौशल्य कार्यशाळेत मी काय वाचावे ? आणि कसे वाचावे ? याविषयावर प्रमुख वक्त्या गौरी डावखरे, शिक्षिका, स्वा. सावरकर मा. विद्यालय, बीड यांनी सखोल मार्गदर्शन केले. या प्रसंगी वाचनाचे प्रकार, कसे वाचावे त्याचे फायदे आणि वाचनाचे प्रात्यक्षिक त्यांनी करून दाखवले आणि घेतले.

ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर यांनी पाहुण्यांचा परिचय आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ग्रंथप्रदर्शन, वाचन, अशा विविध उपक्रमांनी विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रेरित केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. राजपाल जाधव यांनी रोज अर्धा तास तरी अवांतर वाचन करावे असे नमूद केले. डॉ. गंगाधर उष्यमवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. नंदिनी रुईकर हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. महाविद्यालयाचे व शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. सुहास मोराळे व दोन्ही उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हानकर व डॉ.उत्तम साळवे यांनी उपक्रमासाठी मार्गदर्शन केले. या प्रसंगी डॉ. छत्रपती पांगारकर तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, मातोश्री शाळेचे मुख्याध्यापक नागरगोजे बी. डी., जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका डोंगरे मंगल, शिक्षक राहुल सुपेकर व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सदर उपक्रम ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर यांच्या मार्गदर्शनाने पार पडला. या प्रसंगी सचिन चौरे, बाळासाहेब वाघमारे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# शिवगौरव प्रतिष्ठान अंबडतर्फे दर्पण दिनानिमित्त पत्रकारांचा गौरव

## पत्रकार हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ-मान्यवरांचे प्रतिपादन

अंबड / शेख फारुक

शिव गौरव प्रतिष्ठान अंबड यांच्या वतीने दर्पण दिनानिमित्त तालुक्यातील पत्रकार बांधवांचा गौरव व सन्मान सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. समाजातील घडामोडी निर्भीडपणे,वस्तुनिष्ठपणे मांडणाऱ्या पत्रकारांच्या कार्याची दखल घेत या कार्यक्रमात पत्रकारांचा यथोचित सन्मान करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबडचे तहसीलदार मा. विजयजी चव्हाण होते.प्रमुख उपस्थितीत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबासाहेब (भाऊ) इंगळे, पोलीस निरीक्षक संतोषजी घोडके यांच्यासह औदुंबरजी बागडे, राजेंद्रजी डहाळे, समदभाई बागवान, ज्येष्ठ पत्रकार अंकुशरावजी देशमुख (अप्पा), गोविंदप्रसाद मुंदडा, बाबुरावजी खरात, प्रल्हादजी राजपूत, विजयजी कोठोडे, सत्यभानजी खरात आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

पत्रकारितेचे मूल्य जपण्याचे आवाहन-अंकुशराव देशमुख

मार्गदर्शन करताना ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख (अप्पा) म्हणाले की, पत्रकारिता ही केवळ बातमी देण्याची प्रक्रिया नसून समाजासाठी जबाबदारीने काम करण्याचे प्रभावी माध्यम आहे. पत्रकारांनी सत्य, पारदर्शकता आणि निर्भीडपणा या मूल्यांवर पत्रकारिता करावी. कोणत्याही दबावाला बळी न पडता वस्तुनिष्ठ माहिती मांडणे हेच खऱ्या पत्रकाराचे कर्तव्य आहे.ते पुढे म्हणाले की, बातमी संकलन करताना माहिती मिळण्यात अडथळे, प्रशासनाकडून होणारी दुर्लक्षाची भावना, सामाजिक-राजकीय दबाव तसेच आर्थिक अस्थैर्य अशा अनेक अडचणी पत्रकारांना भेडसावतात.तरीही या सर्वांवर मात करून पत्रकारांनी समाजातील दुर्लक्षित घटकांचा आवाज बनले पाहिजे.डिजिटल युगात अफवा व अपूर्ण माहिती वेगाने पसरत असल्याने कोणतीही बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी तिची शहानिशा करणे अत्यंत आवश्यक आहे. पत्रकारिता ही सेवा आहे, व्यवसाय नाही असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

पत्रकार समाजाला दिशा देतात - तहसीलदार विजय चव्हाण

कार्यक्रमाचे अध्यक्ष तहसीलदार विजय चव्हाण आपल्या विस्तारित मनोगतात म्हणाले की लोकशाही व्यवस्थेत पत्रकारिता हा चौथा स्तंभ असून समाजाला योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करतात.शासन, प्रशासन व सामान्य नागरिक यांच्यातील संवादाचा मजबूत दुवा म्हणून पत्रकारांची भूमिका अत्यंत मोलाची आहे.

आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगात बातम्या वेगाने पोहोचत असल्या तरी त्यामागील सत्यता विश्वासार्हता व सामाजिक बांधिलकी जपण्याची जबाबदारी पत्रकारांवर अधिक वाढली आहे. समाजातील समस्या जनतेचे प्रश्न विकासकामे तसेच अन्यायाविरोधातील आवाज शासनापर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकार सातत्याने करत असल्याचे त्यांनी नमूद केले. पत्रकारांनी निर्भीड निःपक्षपाती व वस्तुनिष्ठ पत्रकारिता करताना सामाजिक सलोखा जपावा असे आवाहनही त्यांनी केले.

पत्रकार हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ- बाळासाहेब इंगळे

शिव गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब (भाऊ) इंगळे मार्गदर्शन करताना म्हणाले की, विधिमंडळ कार्यकारी व न्यायपालिका यांच्यासोबत पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. समाजातील सत्य अन्याय, भ्रष्टाचार व जनतेचे प्रश्न निर्भीडपणे जनतेसमोर मांडण्याचे कार्य पत्रकार करतात.

अनेक वेळा दबाव अडचणी व धोके असूनही पत्रकार न डगमगता आपले कर्तव्य बजावत असतो.त्यामुळे पत्रकारांचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी आहे.आजच्या डिजिटल युगात अफवा व खोटी माहिती वेगाने पसरत असताना पत्रकारांनी सत्यता सामाजिक भान व नैतिकता जपून पत्रकारिता करावी असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमात उपस्थित सर्व पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला.दर्पण दिनाच्या निमित्ताने आयोजित या सोहळ्यामुळे पत्रकारांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, समाज व प्रशासन यांच्यातील दुवा अधिक दृढ होण्यास मदत झाली आहे.कार्यक्रमाच्या शेवटी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष जिगे यांनी उपस्थित मान्यवर आयोजक व पत्रकार बांधवांचे आभार मानले. हा सन्मान सोहळा सर्वांच्या स्मरणात राहणारा ठरला.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# स्नेहालयाच्या सद्भावना यात्रेची जिल्हा परिषद माध्यमिक शाळा भाटुंबा येथे सदिच्छा भेट

केज/प्रतिनिधी

दि. ७ जानेवारी २०२६ रोजी स्नेहालय सेवाभावी संस्था अहिल्यानगर या संस्थेची सद्भावना यात्रा सायकलवर सुरू आहे. महाराष्ट्रातील तरुणाईत सामाजिक जाणिवेची प्रेरणा आणि ऐक्य भावना पेरणारी ही सद्भावना सायकल यात्रा दि.३० डिसेंबर २०२५ ते १२ जानेवारी २०२६ या काळात ही यात्रा नांदेड ते अहिल्यानगर अशी निघालेली आहे.या दरम्यानच्या प्रवासात ही यात्रा तरुणाईला संपन्न जीवनाचे तंत्र शिकवण्या साठी कार्यरत आहे.या ११ व्या यात्रे दरम्यान त्यांनी अनेक सामाजिक संस्था व शैक्षणिक संस्थांना भेटी दिल्या आहेत.विद्यार्थ्यांमध्येही जागृती निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न



आहे.या यात्रेच्या काही स्वयंसेवकांनी केज तालुक्यातील नामांकित शाळा जिल्हा परिषद माध्यमिक शाळा भाटुंबा येथे भेट देऊन शाळेला सन्मानपत्र दिले.शाळा व परिसर पाहून आनंद व्यक्त केला.या शाळेने या यात्रेत सहभागी श्री. बाजीराव कानवडे व सौ. हिरा कानवडे हे दोघेही निवृत्त मुख्याध्यापक आहेत.तसेच श्री.रमेश धोत्रे श्री.अनिल वराडे श्री. राजेंद्र धायगुडे,श्रीराम पवार हेही जेष्ठ नागरिक आहेत.तसेच पुनम ठोंबरे संजना चव्हाण व स्नेहल गारुडकर सागर अशा तरुणींचा आणि तरुणांचा ही या यात्रेत समावेश आहे.यात्रेतील श्री. आदिनाथ ढाकणे हे गोदावरी नदी स्वच्छता अभियान प्रकल्पात कार्यरत आहेत.ते गावा गावातील नदी स्वच्छते साठी पोट तिडकेने नदीत केरकचरा फेकू नका असे आवाहन करतात. प्लास्टिक वापरू नका असाही त्यांचा आग्रह आहे तर श्री.सचिन खेडकर हे 'उचल' या संस्थेच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांच्या मुलांचे संगोपन करतात. यावेळी सर्वांनी शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच शाळेतील मुख्याध्यापक डॉ.श्री. कंचनवार सर तसेच सर्व शिक्षक शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी केला. शाळेत त्यांच्या संघाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले तसेच चहा नाश्त्याचे हे आयोजन करण्यात आले होते.

# डॉ.सुरेश कांबळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची पीएचडी प्रदान

केज/प्रतिनिधी

केज येथील लोकनेते बाबुरावजी आडसकर महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागात कार्यरत असलेले सुरेश अर्जुनराव कांबळे यांना रसायनशास्त्र विषयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजी नगर यांनी उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च समजलीजाणारी पीएचडी हीपदवी प्रदान केली आहे

डॉ.सुरेश कांबळे यांनी फार्माकोलॉजिकल स्टडी ऑफ सम हेटरो सायकलीक कंपाउंड विथ स्पेशल रेफरन्स टू सोल्युट - सॉलवंट इंट्रॅक्शन्स या विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात संशोधन प्रबंध सादर केला होता. हा प्रबंध प्रोफेसर डॉ. सुजात कादरी,मौलाना आझाद महाविद्यालय छ. संभाजी नगर यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केला.या मौखिक परिक्षे साठी अध्यक्ष रसायन शास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉक्टर सुनील शंकरवार यांनी तर बाह्य परिक्षक म्हणून कामरून विद्यापीठ नैनिताल येथील प्रोफेसर डॉ.शाह राज अली यांनी काम पाहिले.



डॉ.सुरेश कांबळे यांच्या या यशाबद्दल अंबा सहकारी साखरकारखाना अंबाजोगाईचे चेअरमन रमेशराव आडसकर, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या सौ. अर्चनाताई आडसकर, प्राचार्य डॉ.माधवराव फावडे,उपप्राचार्य डॉ. अनिल किर्दंत,अधिक्षक पी.एस.भोसले,डॉ.अनिल गायकवाड,डॉ.सुवर्णकार, डॉ.शितोळे,डॉ.वेदपाठक व सर्व कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# जिल्हा काँग्रेस कमिटी कडून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

## मनरेगा बचाव आंदोलनात घोषणाबाजी

केज/प्रतिनिधी

केंद्र शासनाने मनरेगा बाबतचा घेतलेला चुकीचा निर्णय हा मजुरांच्या हक्काचे उल्लंघन करणारा आहे.पूर्ववत असलेला मनरेगा कायदा योग्य होता.तो टिकून राहिला हवा यासाठी मनरेगा बचाव आंदोलन

बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शने करत मनरेगा बचाव आंदोलन करण्यात आले.यावेळी घोषणाबाजी करत मनरेगा बचावचा नारा देण्यात आला.निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.


यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या राष्ट्रीय सचिव तथा मराठवाडा प्रभारी श्रीमती रेहना चिस्ती,प्रदेश सरचिटणीस आदित्य दादा पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे,रेखाताई चव्हाण,दादासाहेब मुंडे, गणेश राऊत,नवनाथ थोटे,प्रवीणकुमार शेप,





बाळासाहेब ठोंबरे,प्रताप मोरे,बीड तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे,पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल जाधव,आष्टी तालुकाध्यक्ष फारुख शेख,परळी तालुकाध्यक्ष प्रकाश मुंडे, विशाल मस्के,इलियास टेलर,शहराध्यक्ष परवेज कुरेशी,महिलाजिल्हाध्यक्ष मीनाक्षी पांडुळे,युवक जिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेद्रे,एनएसयूआय जिल्हाध्यक्ष अविनाश दोरपी,इंटक जिल्हाध्यक्ष रामधन जमले,अमोल पाठक,संतोष निकाळजे, डॉक्टर दिलीप मोटे, नगरसेवक वाजेद कुरेशी, अशोक बहिरवाल,हनुमान घोडके,राम शेळके, मुशर्रफ शेख,कविताताई कराड,साळवे मॅडम, नौशाद शेख,सतीश गायकवाड,लक्ष्मण पवळ, सोफियान शेख,साजिद कुरेशी,सय्यद फारुख, इम्रान आतार,मिलिंद मस्के,शिवाजीराव कोठुळे,बाळासाहेब जाधव,भाऊसाहेब ढोणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मालतीबाई देशमुख यांचे निधन



माजलगाव (प्रतिनिधी): शहरातील सन्मित्र कॉलनी येथील रहिवाशी असलेल्या मालती मधुकर देशमुख (परडीकर) वय (७८ वर्ष) यांचे शुक्रवारी पहाटे निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर मंगलनाथ स्मशानभूमी मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे पश्चात दोन मुले, एक मुलगी,सुना, नातवंडे असा परिवार आहे. येथील प्रगतशील शेतकरी मुकुंद व अभियंता मनोज परडीकर यांच्या त्या आई होत.

# शेतकरी बांधवांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पात अर्ज करण्याचे आवाहन - माऊली जरांगे

पाटोदा (प्रतिनिधी) राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने सुरू केलेला नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा२ ) हा शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने अर्ज करावेत, असे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य माऊली जरांगे यांनी केले.या प्रकल्पाअंतर्गत मृद व जलसंधारण, जलस्रोतांचे पुनर्भरण, शाश्वत शेती, पीक पद्धतीत बदल, सूक्ष्म सिंचन, फळबाग लागवड, पशुसंवर्धन तसेच शेतीपूरक व्यवसायांना चालना देण्यावर भर देण्यात आला आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढून उत्पन्नात वाढ होणार असल्याचे त्यांनी सांगितले.शेतकऱ्यांनी आपल्या गावातील कृषी सहाय्यक,किंवा संबंधित विभागाशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह वेळेत अर्ज सादर करावेत,आसे



आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य माऊली जरांगे यांनी केले.शासनाच्या या महत्वाकांक्षी योजनेचा लाभ घेऊन शेतकऱ्यांनी आपल्या शेतीचा विकास साधावा, असे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य माऊली जरांगे यांनीच केले आहे.

# तालुकास्तरीय वैयक्तिक क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजीराव अंडील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन**

धारूर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद बीड मार्फत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यासंदर्भात आदेशित केलेले आहे, त्यानुसार प्रत्येक केंद्रस्तरावर सांघिक तथा वैयक्तिक क्रीडा स्पर्धा राबवून विजेता संघ व खेळाडू यांची तालुकास्तरासाठी निवड करण्यात आली होती, सदरील निवडीच्या अनुषंगानेच वैयक्तिक तसेच लंगडी सांघिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन धारूर येथील चिरका मैदान येथे करण्यात आले होते, सदरील क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजीराव अंडील तसेंच केंद्रप्रमुख रामहरी गांधले व दत्ता घोळवे यांच्या हस्ते करण्यात आले, स्पर्धेसाठी



मार्गदर्शन केंद्रप्रमुख व्यंकट गडदे यांनी केले तर स्पर्धेचे प्रमुख म्हणून रमेश रुद्रे यांनी काम पाहिले.

प्रत्येक केंद्रस्तरावरून निवड झालेल्या विविध जिल्हा परिषद शाळेतील ३री ते ५वी प्राथमिक गट व ६वी ते ८वी चा उच्च प्राथमिक गट या विद्यार्थ्यांनी १०० मीटर धावणे, १०० मीटर रिले, उंच उडी व लांब उडी तसेच लंगडीच्या संघाने स्पर्धेमध्ये भाग घेऊन वेगवेगळ्या शाळेतील विद्यार्थ्यांनी यश मिळवले. प्राथमिक तसेच उच्च प्राथमिक गटातील विजेता खेळाडू व संघाची जिल्हास्तरावर स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

सदरील स्पर्धेचे मुख्य नियोजक सर्जेराव चव्हाण होते तसेंच त्यांना सहकार्य करण्यासाठी भागवत कांदे, आबासाहेब चोले, आप्पराव राठोड व अतुल सूर्यवंशी हे होते तसेंच पंच म्हणून माधव पंतोजी, अंगद राख, हनुमंत मंत्रे,अर्जुन राठोड व आदमाने मॅडम यांनी काम पहिले.

# धम्मध्वज दिनानिमित्त माजलगावात शांती-करुणेचा जागर

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथे जागतिक बौद्ध धम्मध्वज दिनाच्या निमित्ताने एक प्रेरणादायी कार्यक्रम मोठ्या श्रद्धा व शांततामय वातावरणात संपन्न झाला. हा कार्यक्रम धम्म उपासक प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेचे सभासद दीपक भालेराव सर यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने झाली. त्यानंतर धम्मध्वजाचे पूजन करण्यात आले. धम्मध्वज हा शांती, करुणा, मैत्री, समता व प्रज्ञेचे प्रतीक असून तो मानवतेचा वैश्विक संदेश देतो, असे उपस्थितांना सांगण्यात आले.

या कार्यक्रमास सदधम्म सेवा संघाचे सभासद तसेच बहुसंख्य उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात ऍड. दशरथ मकसरे, भगवानराव सातपुते, गौतम घनघाव, नवनाथ



शिनगारे, रविकांत उघडे, प्रभाकर साळवे, सागर सातपुते, प्रशांत सातपुते, विक्रांत चांदमारे, भीमराव कांबळे, सिद्धार्थ ढवळे, नालंदाताई भालेराव व वंदनाताई शिनगारे हे प्रमुख उपस्थित होते.

या प्रसंगी भिक्खू धम्मशील थेरो यांनी जागतिक धम्मध्वज दिनाचे महत्त्व विशद करणारे प्रभावी प्रवचन केले. आजच्या सामाजिक तणाव, द्वेष व असमानतेच्या पार्श्वभूमीवर भगवान बुद्धांचा धम्म हा शांती, नैतिकता व मानवतावादी जीवनमूल्यांचा मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले. दान, शील व प्रज्ञेच्या आचरणातून व्यक्ती व समाजाचे सकारात्मक परिवर्तन शक्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या उपक्रमातून दानशीलता, समभाव व सामूहिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. उपस्थित उपासक-उपासिकांनी धम्म आचरणाचा संकल्प करत कार्यक्रमाची सांगता केली.

संपूर्ण कार्यक्रम शांत, शिस्तबद्ध व धम्ममय वातावरणात पार पडला. अशा उपक्रमांमुळे समाजात बंधुता, सद्भावना व नैतिक मूल्ये अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# अंबाजोगाईकरांना मिळाव्यात मुलभूत नागरी सुविधा - राजकिशोर मोदी

## जनतेच्या समस्यांची सोडवणूक करा - माजी आ.पृथ्विराज साठे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहरातील नागरिकांना स्वच्छता, पाणी पुरवठा व दिवाबत्ती या मुलभूत नागरी सुविधा मिळण्यासाठी लोक विकास महाआघाडीच्या वतीने शुक्रवारी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

लोक विकास महाआघाडीच्या वतीने विविध ६ मागण्यांसाठी शुक्रवार, दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मांजरा धरण, काळवटी साठवण तलाव यावर्षी ही १०० टक्के भरलेले आहेत. असे असताना ही अंबाजोगाई शहरातील सर्व प्रभागांमधील नागरिकांना दहा ते पंधरा दिवसाला पाणीपुरवठा होत आहे. तोही अपुरा, विस्कळीत, अनियमित आहे. पाणी पुरवठा करण्याचे कोणतेही नियोजन नाही. तसेच टाइमटेबल ही पाळले जात नाही. त्यामुळे अंबाजोगाई शहरातील सर्व प्रभागांमधील नागरिकांना स्वच्छ, मुबलक व नियमितपणे पाणीपुरवठा करण्यात यावा. तसे नियोजन नगरपरिषदेमार्फत तात्काळ करण्यात यावे., शहरातील सर्व प्रभागांमध्ये रस्ते, नाल्या, चौक तसेच सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कचरा जमा होवून अस्वच्छता, दुर्गंधी पसरली आहे. तेव्हा नियमीतपणे स्वच्छता होते का..?, घंटागाड्या नियमीतपणे व नियोजनबद्ध पद्धतीने शहरात सर्वत्र फिरतात की, नाही याकडे नियंत्रण ठेवावे, त्यावर जीपीएस ट्रॅकर बसवावे., शहरातील सर्व प्रमुख चौक, रहदारीचे रस्ते व प्रभागातील नगरपरिषदेचे बंद असलेले पथदिवे तातडीने दुरूस्त करून सुरू करावेत. त्या ठिकाणी हायमास्ट दिवे बसवावेत. जेणेकरून अंधाराच्या खाईत लोटले गेलेले शहर प्रकाशमान होईल., नगरपरिषद कार्यालयातील कर्मचारी तसेच कंत्राटी कामगार यांचे पगार नियमितपणे होत नाहीत. ते नियमितपणे केले जावेत. तशी आर्थिक तरतूद तात्काळ करण्यात यावी., बुट्टेनाथ साठवण तलाव निर्मिती करणे, काळवटी साठवण तलावाची उंची वाढविण्यासाठीचा प्रस्ताव तयार करून तो शासनाकडे मंजुरीसाठी तात्काळ पाठवावा आणि रस्ते भटक्या कुत्र्यांपासून मुक्त करा, कारण, भटकी कुत्री केवळ चावतात असे नाही, तर ते गंभीर अपघातांनाही कारणीभूत ठरतात. रस्ते भटक्या कुत्र्यांपासून मुक्त आणि मोकळे ठेवावे लागतील कारण, मागील काही दिवसांपूर्वी अंबाजोगाई शहरातील अनेक नागरिक आणि मुलांना भटक्या व पिसाळलेल्या कुत्र्यांनी चावा घेवून गंभीर जखमी केले आहे. तरी तात्काळ भटक्या व पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशा मागण्यांचा समावेश आहे. सदरील विषयांवर आपण तात्काळ योग्य ती कार्यवाही करावी. आणि



अंबाजोगाईतील नागरिकांना मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात अन्यथा याप्रश्नी लोक विकास महाआघाडीला जनतेच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल याची आपण नोंद घ्यावी असा इशारा सदरील निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर निवेदक राजकिशोर मोदी (प्रमुख - लोक विकास महाआघाडी.), पृथ्वीराज साठे, (माजी आमदार), बबनराव लोमटे (माजी उपनगराध्यक्ष), सय्यद ताहेरभाई (गटनेता - लोक विकास महाआघाडी, नगरपरिषद, अंबाजोगाई.), नगरसेवक हाजी इस्माईल हिरू गवळी, दिनेश मोतीलाल भराडीया, महेश बाळासाहेब कदम, महेश बालासाहेब लोमटे, ऍड.विकास रामकृष्ण काकडे, मालू भगवानराव जोगदंड, आकाश जिवनराव कराड, राजपाल संभाजीराव जावळे, नजीर उमरदराजखान पठाण, सौ.जयश्रीताई पृथ्वीराज साठे, सौ.दिपाताई बबनराव ऊर्फ दाजीसाहेब लोमटे, शेख शमीम शेख रहीम, बशीरा शफीक सय्यद, नाजनीन बेगम अकबरखाँ पठाण, शेख शिरीन अशफाक, सौ.श्रुतीताई अमोलराव लोमटे, सौ.संगिताताई दाजीसाहेब लोमटे, सौ.रेखाताई विलासराव जाधव आणि सौ.सोनीताई दत्तात्रय सरवदे

# खा.बजरंग सोनवणे घेणार विकासाच्या 'दिशा' चा आढावा

## १३ जानेवारी ला होणार मॅरेथॉन बैठक, केंद्र,राज्यांच्या योजनांचा समावेश

बीड/प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या विविध महत्त्वाकांक्षी योजना आणि राज्य शासनाच्या विकासात्मक उपक्रमांची जिल्हास्तरावर प्रभावी अंमलबजावणी व्हावी,या उद्देशाने जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवार दि. १३ जानेवारी रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत दिशा समितीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. लोकसभा सदस्य व दिशा समितीचे अध्यक्ष खा. बजरंग सोनवणे यांच्या पुढाकाराने ही बैठक होत असून ते विकास कामांचा आढावा घेणार आहेत.या संदर्भात खासदार बजरंग सोनवणे यांच्या सुचनेनंतर जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागप्रमुख,यंत्रणा प्रमुख व अंमलबजावणी अधिकाऱ्यांना दिशा समितीच्या बैठकीस सक्तीने उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत.बैठकीदरम्यान केवळ औपचारिक आढावा न घेता,प्रत्यक्ष कामांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रस्ताव,निधी वितरण,अडचणी व त्यावरील उपाययोजना तसेच पुढील कालावधी साठी कृती आराखडा यावर सखोल चर्चा केली जाणार आहे.या बैठकीत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या १३ महत्त्वाच्या योजना व विभागांचा मुद्देनिहाय आढावा घेतला जाणार आहे.यात प्रामुख्याने नेहरू युवा केंद्र,महिला,बालविकास विभागांतर्गत पोषण, अंगणवाडी व महिला सक्षमीकरण योजना, कौशल्य विकास विभागाच्या प्रशिक्षण व रोजगाराभिमुख योजना, तसेच प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत रस्ते विकास कामांची प्रगती यांचा समावेश आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन,प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजना,प्रधानमंत्रीआवास योजनेंतर्गत घरकुलांची सद्यस्थिती,जलजीवन मिशनमधील नळजोडणी व पाणीपुरवठा,तसेच पर्यटन व संस्कृती विभागा अंतर्गत पर्यटनविकासाची कामे यांचाही सखोल आढावा घेतला जाणार आहे.



### आरोग्य,उद्योग व सामाजिक योजनांवर विशेष भर

बैठकीत आरोग्य विभागा अंतर्गत केंद्र शासन पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी,संजय गांधी निराधार योजना, एक जिल्हा एक उत्पादन योजनेद्वारे स्थानिक उद्योगांना चालना,तसेच प्रधानमंत्री जनधन अभियानांतर्गत आर्थिक समावेशनाची स्थिती यावरही चर्चा होणार आहे.

### अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना

सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी अद्ययावत अहवाल,प्रगती आकडेवारी,प्रलंबित प्रकरणांची यादी आणि पुढील सहा महिन्यांचा कृती आराखडा घेऊन बैठकीस उपस्थित राहावे, अशा स्पष्ट सूचना खा. सोनवणे यांनी दिल्या आहेत.योजनांची अंमल बजावणी केवळकागदावर न राहता ती थेट लाभार्थ्यां पर्यंत पोहोचली पाहिजे, यावर बैठकीत भर दिला जाणार आहे.

### विकासाला गती मिळण्याची अपेक्षा

या दिशा समिती बैठकी मुळे बीड जिल्ह्यातील विकासकामांतीलअडथळे दूर होऊन,योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.विशेषत: ग्रामीण भागातील रोजगार,पायाभूत सुविधा, पाणी,वीज,आरोग्य व निवारा या मूलभूत प्रश्नांवर ठोस निर्णय होण्याची शक्यता आहे.

# मुख्यमंत्री सौर कृषी वीज वाहिनी २.० अंतर्गत आष्टी-पाटोदा-शिरूर तालुक्यांना मोठा दिलासा

आ. सुरेश धस यांच्या प्रभावी पाठपुराव्याने ११ उपकेंद्रांमध्ये नवीन पावर ट्रान्सफॉर्मर मंजूर

पाटोदा /प्रतिनिधी-मुख्यमंत्री सौर कृषी वीज वाहिनी २.० या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यांमधील कृषी वीजपुरवठा अधिक सक्षम व सुरळीत करण्यासाठी मोठा निर्णय घेण्यात आला असून, या तीनही तालुक्यांतील एकूण ११ वीज उपकेंद्रांमध्ये प्रत्येकी १० व ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे नवीन ॲडिशनल पावर ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आले आहेत.

ही सर्व मंजुरी आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा, प्रशासनाशी केलेल्या समन्वयपूर्ण चर्चा व शेतकऱ्यांच्या अडचणी सातत्याने मांडल्यामुळे शक्य झाली आहे. कृषी वीजपुरवठ्यातील तांत्रिक अडचणी, वाढता भार व अपुरा ट्रान्सफॉर्मर क्षमतेमुळे निर्माण होणाऱ्या समस्या लक्षात घेऊन आमदार धस यांनी हा विषय प्राधान्याने शासनदरबारी लावून धरला होता.

या निर्णयानुसार पुढील उपकेंद्रांमध्ये १० एम.व्ही.ए क्षमतेचे नवीन या ॲडिशनल पावर ट्रान्सफॉर्मर मंजूर झाले ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, आष्टी,३३/११ के.व्ही. उपकेंद्र,धानोरा येथे तर ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे नवीन ॲडिशनल पावर ट्रान्सफॉर्मर मंजूर झाले आहेत.३३/११ के.व्ही. उपकेंद्र, सावरगाव,३३/११ के.व्ही. उपकेंद्र, जळगाव (कडा कारखाना),३३/११ के.व्ही. उपकेंद्र, डोईठाण,३३/११ के.व्ही. उपकेंद्र, कुसळंब,३३/११ के.व्ही. उपकेंद्र, लांबरवाडी,३३/११ के.व्ही. उपकेंद्र, कोतन,३३/११ के.व्ही. उपकेंद्र, दासखेड,३३/११ के.व्ही. उपकेंद्र,घाटशीळ पारगाव३३/११ के.व्ही. उपकेंद्र, भायाळ या नव्या ट्रान्सफॉर्मरमुळे कृषी पंपांना स्थिर वीजपुरवठा, भार नियंत्रण, कमी व्होल्टेजची समस्या दूर होणे तसेच शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत अधिक दर्जेदार वीज मिळण्यास मोठी मदत होणार आहे.परिणामी शेती उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही सकारात्मक परिणाम दिसून येणार



आहे.

आमदार सुरेश धस यांनी नेहमीच शेतकरी, कृषी व ग्रामीण विकासाशी संबंधित प्रश्नांना अग्रक्रम दिला असून, त्यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे व ठाम पाठपुराव्यामुळेच ही महत्त्वाची कामे मंजूर झाल्याची भावना परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये व्यक्त करून राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस व आ.सुरेश धस यांचे आभार मानले आहेत.



# पाटोदा पत्रकार संघाकडून दर्पण दिन उत्साहात साजरा

पाटोदा ( प्रतिनिधी ) पाटोदा तालुका पत्रकार संघाच्या वतीने दि.६ जानेवारी रोजी दर्पण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पत्रकारितेचे आद्य जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमास पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे,सचिव एडोकेट महेश बेदरे,कार्याध्यक्ष अमीर शेख यांच्यासह पत्रकार सुधीर एकबोटे, ,विजय जाधव,आजीज शेख राहुल सोनवणे,शेख महेश्वर, दत्ता वाघमारे,सचिन गायकवाड,अमीर शेख,रियाज सय्यद आदी पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.दर्पण दिनाचे औचित्य साधून पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांच्या पुढाकारातून उपस्थित पत्रकार बांधवांना डायरी,लेखणी साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी बोलताना एडोकेट महेश बेदरे यांनी दर्पण दिनाचे महत्त्व विशद केले. लोकाभिमुख आणि लोकहितवादी पत्रकारिता ही काळाची गरज असून समाजातील विविध समस्या,जनतेच्या अडचणींसह विकासात्मक व सकारात्मक बाबीही माध्यमांद्वारे सातत्याने मांडल्या गेल्या पाहिजेत असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पाटोदा तालुका पत्रकार संघातील सर्व पत्रकार बांधवांनी सहकार्य केले. दर्पण दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमास पत्रकार बांधवांची लक्षणीय उपस्थिती होती.

# आत्मविश्वास आणि नेतृत्व गुण स्वयंशासन दिनामुळे वाढतो - प्राचार्य वाय बी भोसले

## २००० विद्यार्थी १२० विद्यार्थी शिक्षकाची फौज घेऊन विद्यार्थी मुख्याध्यापिका प्रतिज्ञा कवचट हिने संभाळली शाळा

खोडकर मुले शिक्षक होतात तेव्हा वर्गात शांतता ठेवण्यासाठी झालेली दमछाक पाहण्यासारखी

वडवणी /प्रतिनिधी

शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवत असताना किती अग्निदिव्यातून जावे लागते याची अनुभूती विद्यार्थ्यांना देण्यासाठी स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य वाय बी भोसले बोलताना म्हणाले की स्वयं शासन दिनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि नेतृत्व गुण विकसित होतात

सविस्तर वृत्त असे की वडवणी येथील डॉ. सोनाजीराव रांजवन विद्यालयात विद्यार्थी स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी प्राचार्या पासून ते सेवकापर्यंतच्या सर्व भूमिका अगदी तंतोतंतपणे योग्य पद्धतीने पार पाडल्या अनेक विद्यार्थी शिक्षकांची वर्गात शिकवत असताना धांदल उडाली त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये हास्याचा जल्लोष दिवसभराच्या कामकाजात दिसून आला तरी विद्यार्थी शिक्षकांमध्ये आपण शिक्षक झाल्याची भावना त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट



दिसत होत्या विद्यार्थी मुख्याध्यापिका प्रतिज्ञा कवचट, विद्यार्थी उपमुख्याध्यापिका समृद्धी मस्के, पर्यवेक्षक प्राची माने या विद्यार्थ्यांनी वडवणी तालुक्यातील २००० विद्यार्थी संख्या असलेली सगळ्यात मोठी शाळाचा कारभार योग्य पद्धतीने दिवसभरासाठी सांभाळला सदरील विद्यार्थ्यांना प्राचार्य वाय बी भोसले, पर्यवेक्षक जयदेव लांडे आणि इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक डी एस जाधवर, भागवत बुंदाटे, अर्जुन म्हेत्रे आधी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले

स्वयंशासन दिन स्वयंशासन दिन म्हणजे विद्यार्थ्यांचा आनंदाचा दिवस विद्यार्थी शिक्षकाच्या भूमिकेत जाऊन तल्लीन होऊन शिकवत होते विद्यार्थी सुद्धा त्यांना योग्य पद्धतीने प्रतिसाद देत होते यावेळी बऱ्याचशा विद्यार्थी शिक्षकांनी आपले कौशल्यपणाला लावून चांगल्या पद्धतीने तास घेतले तर काहींची मात्र तारांबळ उडाली आमच्या प्रतिनिधीशी बोलताना बऱ्याचशा विद्यार्थ्यांनी सांगितले की विद्यार्थी होणे सोपे आहे परंतु शिक्षक होणे अवघड आहे ते आम्हाला शिक्षक झाल्यावरच कळाले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शाळेतील शिक्षकांनी परिश्रम घेतले

एवढ्या मोठ्या शाळेची एक दिवसाची विद्यार्थी मुख्याध्यापक बनण्याचं मला भाग्य लाभलं परंतु एका दिवसांनी जबाबदारी काय असते ते शिकवलं विद्यार्थी होणे सोपे आहे परंतु शिक्षक होणे अवघड आहे ते मला शिक्षक झाल्यावरच कळले

# दुःखावर फुंकर घालणारी पत्रकारांची माणुसकी

## डोंगरे कुटुंबासाठी मदत फेरीतून उभारला एक लाखांचा भक्कम आधार




वडवणी /प्रतिनिधी

डोंगरेवाडी येथील ऊसतोड मजुर गणेश डोंगरे यांचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाल्याने एका कष्टकरी कुटुंबाचा कणा मोडला. कुटुंबाचा आधारवड हिरावल्याने वयोवृद्ध आई-वडील,पत्नी आणि मुलींवर दुःखाचा डोंगर कोसळला. अशा अत्यंत वेदनादायी परिस्थितीत वडवणी तालुक्यातील पत्रकारांनी केवळ बातमीपुरते मर्यादित न राहता माणुसकीचा झेंडा उंचावत थेट मदतीसाठी पुढाकार घेतला.

पत्रकारांच्या वतीने काढण्यात आलेल्या मदत फेरीला वडवणी शहरातील व्यापारी बांधवांसह नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. व्यापारी, व्यावसायिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांनी डोळ्यांत करुणा आणि मनात सहवेदना ठेवून सढळ हाताने मदत केली. या एकजुटीच्या प्रयत्नातून तब्बल एक लाख रुपयांची रक्कम जमा झाली आहे.ही रक्कम मृत ऊसतोड कामगाराच्या मुलींच्या शिक्षण आणि उज्ज्वल भविष्यासाठी त्यांच्या नावाने बँकेत मुदत ठेव (एफडी) स्वरूपात ठेवण्यात येणार आहे. कर्त्या पुरुषाच्या अकाली जाण्याने पोरकं झालेलं कुटुंब पुन्हा उभं राहावं, मुलींच्या शिक्षणात कोणतीही अडचण येऊ नये, या उदात्त हेतूने पत्रकार बांधवांनी सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबविला.

या मदत फेरीत सामाजिक कार्यकर्त्यांचाही सक्रीय सहभाग लाभला. या संवेदनशील आणि कृतिशील उपक्रमामुळे पत्रकारिता ही केवळ शब्दांची नसून, गरजेच्या वेळी धावून येणारी माणुसकी असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. पत्रकारांच्या या आदर्श भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत असून, अजूनही माणुसकी जिवंत आहे याची प्रचिती समाजाला मिळाली आहे.



# आनंदऋषीजी नेत्रालय व व्हिजन सेंटर माजलगाव चा पाचवा वर्धापन दिन

## मोफत नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया

माजलगाव / प्रतिनिधी

जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीची नेत्रालय हॉस्पिटलमध्ये ३६५ दिवस २४ तास आरोग्य सेवेचा यज्ञ अखंड सुरू आहे.काल माजलगाव येथील आनंदऋषीजी नेत्रालय व्हिजन सेंटर यांचा पाचवा वर्धापन दिन साजरा झाला असून आजपर्यंत पाच वर्षाच्या कार्य काळामध्ये माजलगाव येथील आनंदऋषीजी नेत्रालय व व्हिजन सेंटर माजलगाव येथे पंचावन्न हजार दोनशे चौतीस रुग्णांची नेत्र तपासणी व सात हजार तेरा रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया माजलगाव व्हिजन सेंटरच्या मार्फत झाली असून आज त्या रुग्णांना कायमची दृष्टी आल्याने गोरगरीब रुग्णांमध्ये आनंद व्यक्त होत असून अल्प दरात तज्ञ डॉक्टरांकडून शस्त्रक्रिया करून आनंदऋषीजी नेत्रालय अहमदनगर ही संस्था महाराष्ट्र भरात अतीप्रसिद्ध झाली असून वाढत्या विश्वास आनंदऋषीजी नेत्रालया ला मिळत असल्याचे दिसून येत आहे.

काल दिनांक ९ जानेवारी रोजी माजलगाव येथील आनंदऋषीजी नेत्रालय व व्हिजन सेंटर पाच वर्ष पूर्ण झाले असून सहाव्या वर्षात पदार्पण करत आहे. दृष्टी तज्ञ गणेश मस्के सर माजलगाव येथील व्हिजन सेंटर उपलब्ध असुन ते संगणकाद्वारे नेत्र तपासणी, मोतीबिंदू चिकित्सा तपासणी, स्लिट लॅम्प चिकित्सा, रेटिना नेत्रपटल तपासणी, दृष्टी चिकित्सा व नंबर काढणे, ग्लुकोमा काचबिंदू चिकित्सा आदी तपासणी करून जे काही निदर्शनास येईल रुग्णांना शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता असते अश्या रुग्णांना अल्पदरात माजलगाव येथून मंगळवारी आणि शुक्रवारी अहमदनगर येथे संस्थेच्या बस मधुन घेऊन गेले जाते तिथे राहण्याची खाण्याची सुंदर अशी व्यवस्था असते शस्त्रक्रिया झाल्यानंतर संस्थेची बस माजलगाव येथे रुग्णांना सोडण्यासाठी परत येते.

# बाल प्रतिभा संगम स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना अभिव्यक्तीचे सुंदर व्यासपीठ



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

श्री.खोलेश्वर प्राथमिक विद्यालय, प्रगती वर्ग येथील वार्षिक स्नेहसंमेलन बालप्रतिभा संगम बुधवार, दि.७ जानेवारी २०२६ रोजी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाले.

प्रगती विभागाच्या प्रमुख सौ.वर्षाताई मुंडे यांच्या संकल्पनेनुसार संमेलनास शुभं करोति कल्याणम - संस्कारधारा परिवर्तनाची असे नांव देण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन बालवाडी, पहिली, दुसरी व तिसरी, चौथी अशा दोन सत्रांमध्ये करण्यात आले होते. सकाळच्या सत्रात अध्यक्ष म्हणून खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह किरण कोदरकर, उद्धाटक म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाईचे संचालक पुरूषोत्तम भन्साळी, विशेष उपस्थिती म्हणून भा.शि.प्र.संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य नितीन चौधरी हे उपस्थित होते. तसेच पालक प्रतिनिधी म्हणून सौ.शिवकन्या चाटे आणि विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून चि.सर्वेश गोरे व कु.वैष्णवी गायकवाड हे उपस्थित होते. दुपारच्या सत्रात अध्यक्ष म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्रजी आलूरकर, प्रमुख उपस्थिती म्हणून भा.शि.प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे, प्रमुख पाहुणे म्हणून नवनिर्वाचित नगरसेविका सौ.सुचिता देशपांडे, उद्धाटक म्हणून अंबाजोगाईतील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ.मधुसूदन बाहेती, विशेष उपस्थिती म्हणून भा.शि.प्र.संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणी सदस्या डॉ.सौ.कल्पना चौसाळकर, खोलेश्वर सीबीएससी स्कूलचे अध्यक्ष डॉ.गोपाळराव चौसाळकर, भा.शि.प्र.संस्थेचे केंद्रीय विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे तसेच पालक प्रतिनिधी म्हणून तानाजी शिवाजी तागड हे उपस्थित होते. भा.शि.प्र.संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा मुख्याध्यापक विष्णू सोनवणे, भा.शि.प्र.संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणी सदस्या तथा प्रगती विभागाच्या विभागप्रमुख सौ.वर्षाताई मुंडे, दोन्ही सत्रात प्राथमिक विभाग शालेय समिती अध्यक्ष उन्मेष दादा मातेकर उपस्थित होते. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना अभिव्यक्तीचे सुंदर व्यासपीठ मिळाले. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्ज्वलन व नटराज यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांची नोंद असलेल्या स्पर्श पंखाचे या पुस्तिकेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. कार्यक्रमातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पंचपरिवर्तन संकल्पनेतील स्वदेशी, नागरिक शिष्टाचार, पर्यावरण संरक्षण, समरसता व कुटुंब प्रबोधन या विषयांचा प्रभावी संदेश सांस्कृतिक कार्यक्रमातून देऊन उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचा मूळ उद्देश राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पंच परिवर्तनातून सर्वांचे कल्याण व्हावे हा संदेश, हा संस्कार सर्वांपर्यंत पोहोचविणे हा होता. म्हणून या संमेलनाला शुभं करोति कल्याणम - संस्कारधारा परिवर्तनाची संबोधले. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील यशाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, शिस्त आणि कष्ट या आधारे उज्ज्वल भवितव्य घडवावे, असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले.



## मानव लोक संचलित मनस्विनी महिला प्रकल्पा अंतर्गत युवती व महिला मेळावा उत्साहात संपन्न

अंबाजोगाई/प्रतिनिधी

मानव लोक संस्थेच्या वतीने संचलित मनस्विनी महिला प्रकल्पाअंतर्गत अंबाजोगाई येथे युवक व महिला मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.महिलांचे सक्षमीकरण,आत्मभान आणि हक्कांची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यास युवक युवतीं सह महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

मेळाव्यात मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अलका पावनगडकर यांनी महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराच्या विविध प्रकारांवर सखोल मार्गदर्शन केले.यावेळी एका लग्नाची कोर्टातील गोष्ट हे सामाजिक आशयाचे नाट्य सादर करण्यात आले.या नाटकाच्या माध्यमातून विवाहातील अन्याय, कायदेशीर बाबी,महिलांचे अधिकार आणिहिंसाचारा विरोधातील उपाययोजना प्रभावीपणे मांडण्यात आल्या.नाट्यसादरीकरणा नंतर युवती व महिलां सोबत खुली चर्चा घेण्यात आली.महिलांनी आपले अनुभव मोकळेपणाने मांडले,तर मार्गदर्शकांनी कायदेशीर मदत व सामाजिक आधार याविषयी सविस्तरमाहिती दिली.या मेळाव्यात दुसऱ्या मार्गदर्शक म्हणून समता जाधव यांची उपस्थिती लाभली.फिल्म इंडस्ट्रीत कार्यरत असलेल्या समता जाधव या हास्य जत्रा थिएटर तसेच चित्रपटसृष्टीत सक्रिय आहेत.त्यांचा नुकताच कैरी हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे.त्यांनी आपल्या आयुष्यात आलेल्या अडचणी,संघर्ष आणि त्यावर मात करत कसे पुढे गेल्या याचा प्रेरणा दायी प्रवास महिलांसमोर उलगडला.कोणतीही महिला कमकुवत नसते ; ती कणखर असते.योग्य संधी,आत्मविश्वास आणि सातत्य असेल तर प्रत्येक महिला स्वतः्चे अस्तित्व निर्माण करू शकते,असा ठाम संदेश त्यांनी दिला.

# जागतिक हिंदी दिवस : शब्दांचा संस्कार , संस्कृतीचा सेतू आणि जगाशी संवाद साधणारी भारताची ओळख

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसते ; ती संस्कृतीची ओळख असते , इतिहासाची साक्ष असते आणि समाजमनाचे प्रतिबिंब असते . ज्या भाषेत माणूस स्वप्न पाहतो , वेदना मांडतो आणि आनंद वाटतो - ती भाषा त्याच्या अस्तित्वाचा गाभा बनते . अशा भाषांमध्ये हिंदीचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे . १० जानेवारी रोजी साजरा होणारा जागतिक हिंदी दिवस हा हिंदी भाषेच्या या व्यापक , समृद्ध आणि जागतिक प्रवासाचा उत्सव आहे .

जागतिक हिंदी दिवसाचा इतिहास आणि संदर्भ : १० जानेवारी १९७५ रोजी नागपूर येथे पहिले जागतिक हिंदी संमेलन आयोजित करण्यात आले होते . या संमेलनात जगभरातील हिंदीप्रेमी , लेखक , कवी , अभ्यासक आणि विचारवंत एकत्र आले . हिंदी ही केवळ भारतापुरती मर्यादित भाषा नसून , ती जागतिक संवादाची शक्ती बनू शकते - हा विचार या संमेलनातून पुढे आला . या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ भारत सरकारने १० जानेवारी हा जागतिक हिंदी दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला .

१४ सप्टेंबर : राष्ट्रीय हिंदी दिवसाचे महत्त्व - हिंदी भाषेच्या इतिहासात १४ सप्टेंबर या तारखेलाही विशेष स्थान आहे . १४ सप्टेंबर १९४९ रोजी हिंदीला भारतीय संविधानात राजभाषेचा दर्जा देण्यात आला . या घटनेच्या स्मरणार्थ १४ सप्टेंबर हा राष्ट्रीय हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो . म्हणजेच - १४ सप्टेंबर हा हिंदीच्या संवैधानिक ओळखीचा दिवस आहे , तर १० जानेवारी हा हिंदीच्या जागतिक प्रवासाचा आणि आंतरराष्ट्रीय स्वीकाराचा दिवस आहे . दोन्ही दिवस परस्परपूरक असून हिंदी भाषेच्या वेगवेगळ्या परिमाणांना उजाळा देतात .



हिंदी : जगभर पसरलेली भारतीय ओळख -- आज हिंदी भाषा केवळ भारतातच नव्हे , तर जगातील अनेक देशांत बोलली जाते . मॉरिशस , फिजी , सुरिनाम , त्रिनिदाद , टोबॅगो , नेपाळ , दक्षिण आफ्रिका , संयुक्त अरब अमिराती , अमेरिका , कॅनडा , ब्रिटन - या देशांत हिंदीने आपली मुळे घट्ट रोवली आहेत . परदेशातील भारतीय समुदायाने हिंदी जपली , वाढवली आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली .

भारतामध्ये उत्तर प्रदेश , बिहार , मध्य प्रदेश , राजस्थान , हरियाणा , झारखंड , छत्तीसगड , दिल्ली या राज्यांमध्ये हिंदी मोठ्या प्रमाणावर बोलली जाते . मात्र महाराष्ट्र , गुजरात , कर्नाटक , आंध्र प्रदेश , तामिळनाडू , केरळ या राज्यांमध्येही हिंदी संपर्कभाषा म्हणून मोठ्या प्रमाणावर स्वीकारली गेली आहे .

जगातील भाषांमध्ये हिंदीचे स्थान :- जगातील सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये हिंदीचा समावेश अग्रक्रमाने होतो . मातृभाषा आणि द्वितीय भाषा म्हणून हिंदी बोलणाऱ्यांची संख्या कोट्यवधींमध्ये आहे . ही संख्या केवळ आकड्यांची नसून , ती हिंदीच्या स्वीकाराची साक्ष आहे .हिंदी साहित्य : शब्दांमधून उभा राहिलेला समाज -- हिंदी साहित्य म्हणजे केवळ पुस्तके नव्हेत ; तो समाजमनाचा आरसा आहे .

तुलसीदास , कबीर , सूरदास यांनी भक्तीच्या माध्यमातून माणूसपण शिकवले . मुंशी प्रेमचंद यांनी शेतकरी , कामगार , स्त्री , दलित यांच्या वेदना शब्दांत उतरवल्या . महादेवी वर्मा , निराला , दिनकर , हरिवंश राय बच्चन यांनी हिंदीला वैचारिक उंची दिली . वसुधैव कुटुंबकम् ही भावना हिंदी साहित्याने घराघरात पोहोचवली .

हिंदी चित्रपट : लोकसंस्कृतीचा प्रवाह - हिंदी चित्रपटांनी हिंदी भाषा जगभर पोहोचवली .

मेरा जूता है जापानी ,
सारे जहाँ से अच्छा ,
ये देश है वीर जवानों का - ही गाणी केवळ मनोरंजन नाहीत , ती राष्ट्रीय भावना जागवणारी ओळख आहेत . चित्रपटांच्या संवादातून , गीतांमधून हिंदी सामान्य माणसाच्या ओठांवर आली . हिंदी आणि भारतीय एकात्मता - भारत विविध भाषांचा , धर्मांचा , संस्कृतींचा देश आहे .

या विविधतेत हिंदी ही सेतूभाषा बनली . हिंदीमुळे देशाच्या एका टोकाचा माणूस दुसऱ्या टोकाशी संवाद साधू शकतो . ही भाषा कुणावर लादलेली नाही , तर लोकांनी स्वीकारलेली आहे - हीच तिची ताकद आहे .जागतिक हिंदी दिवसाचा संदेश : - जागतिक हिंदी दिवस आपल्याला सांगतो - भाषा जपणे म्हणजे संस्कृती जपणे . भाषा वाढवणे म्हणजे विचार वाढवणे . आणि भाषा जोडते , ती तोडत नाही . आज डिजिटल युगात हिंदी नवे रूप घेत आहे . मोबाईल , समाजमाध्यमे , संकेतस्थळे , चित्रफिती - या सगळ्यांत हिंदी अधिक प्रभावी होत आहे .१० जानेवारी - जागतिक हिंदी दिवस आणि १४ सप्टेंबर - राष्ट्रीय हिंदी दिवस

हे दोन्ही दिवस हिंदी भाषेच्या दोन भिन्न पण महत्त्वाच्या ओळखी आहेत . हिंदी ही केवळ भाषा नाही ; ती भारतीय आत्म्याचा श्वास आहे . ती जिथे जाईल , तिथे भारत जाईल .


**-चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
तहसीलदार , बीड

# फातिमा शेख यांचा जयंतीदिन

दगड,चिखल,शेण,शिव्या, अपमान,हेटाळणी, तिरस्काराची वागणूक अश्या सगळ्या गोष्टी सहन करत स्त्रि शिक्षणाचं क्रांतिकारी कार्य करणाऱ्या सावित्रीबाईंच्या खांद्याला खांदा लावून त्या प्रतिकूल परिस्थितीत कामं करणाऱ्या फातिमा शेख यांचा आज जयंतीदिन.

चुकीचा,काल्पनिक आणि मुस्लिमांचा तिरस्कार वाढविण्यासाठी मोलाचं हातभार लागेल असा कथित इतिहास अतिशय रंगवून लिहण्याचं काम व्यापक प्रमाणात झालं आणि त्याचे परिमाण देखील सध्या आपण तितक्याच व्यापक प्रमाणात पाहात आहोत.

मात्र खऱ्या अर्थाने ज्यांनी शोषित,दलित,वंचितांना सन्मान मिळवून देण्याच आणि त्यांना मुख्य प्रवाहात घेऊन येण्याचं कार्य केलं,ते देखील त्या काळात जेंव्हा त्यांना कित्येक यातना सहन कराव्या लागल्या.मात्र त्या कणखरपणे आणि निडरपणे आपल्या क्रांतिकारी कार्याला पुढे घेऊन गेल्या




आणि समाजात असणारी विषमता मोडीत काढली.दगड,चिखल,शेण, शिव्या,अपमान, हेटाळणी,तिरस्काराची वागणूक अश्या सगळ्या गोष्टी सहन करत स्त्रि शिक्षणाचं क्रांतिकारी कार्य करणाऱ्या सावित्रीबाईंच्या खांद्याला खांदा लावून त्या प्रतिकूल परिस्थितीत कामं करणाऱ्या फातिमा शेख यांचा आज जयंतीदिन.

खरं तर आपल्यासाठी फातिमा शेख यांचं कार्य गौरवशाली आणि अनंतकाळ प्रेरणादायी आहे!ज्यांनी चांगलं कामं केलं,वंचित समाजाला शोषणातून बाहेर काढण्याचं कामं केलं अश्यांचा इतिहास मात्र व्यवस्थितपणे आपल्यापर्यंत पोहचत नाही किंवा पोहोचू दिला जात नाही.विशेषकरून ती व्यक्ती जर मुस्लिम असेल तर..आणि तिथेच आपण कमकुवत होतो.कारण तिथेच द्वेषाचा धंदा करणाऱ्यांना स्पेस मिळतो.

अश्यावेळी आपलं कर्तव्य आणि जबाबदारी बनते की ऐतिहासिक कार्य करणाऱ्या ह्या गौरवशाली लोकांना आणि त्यांच्या कार्याला समाजासमोर घेऊन जाण्याचं.आपण खऱ्या गोष्टी लोकांपर्यंत पोहोचवल्या नाहीत तर खोट्या गोष्टींतून द्वेष पसरवणारी फौज तर तयारच आहे!क्रांतीज्योती सावित्रीबाईंच्या सहकारी,सहशिक्षिका फातिमा शेख यांच्या स्मृतीस जयंतीदिनानिमित्त खिराज ए अखिदत!




बीड विधानसभा मतदारसंघातील मौजे शिवणी येथील युवा नेते श्री. विजय सुपेकर, सरपंच श्री. अजय सुपेकर, ग्रामपंचायत सदस्य राधाबाई अभिमान सानप , ग्रामपंचायत सदस्य निताताई सूर्यवंशी , बबन डोळस यांनी आमदार श्री. विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी आमदार श्री. विजयसिंह पंडित यांनी त्यांचे स्वागत करून सत्कार केला. पक्षप्रवेश प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अशोक हिंगे, तालुकाध्यक्ष ड.राजेंद्र राऊत, भाऊसाहेब डावकर, रमेश चव्हाण, सरपंच तेजाब चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

# मुक्त पत्रकारितेची तपपूर्ती

मुक्त पत्रकारितेच्या तपपूर्ती निमित्ताने मनमोकळे करताना थोडेसे माझ्या मनातले या लेखाच्या माध्यमातून आपणा सर्वांसमोर मांडत आहे.दिनांक ३० डिसेंबर २०१३ हा तो दिवस होता, ज्या दिवशी माझ्या हातून लिहिलेला पहिला लेख प्रकाशित झाला होता. याला ३० डिसेंबर २०२५ रोजी १२ वर्षे पूर्ण झाली आहेत. १२ वर्ष म्हणजे एक तप. पाण्याच्या बुडबुड्या सारख्या असलेल्या पत्रकारिता क्षेत्रात एक मुक्तपत्रकार म्हणून सातत्याने १२ वर्षे लिखाण करणे आणि ते स्थानिक वृत्तपत्रांसह विभागीय वृत्तपत्रात प्रकाशित होणे हे निश्चितच सोपे नाही.

माय मराठीची सतत साधना, लिखाणाची तपश्चर्या आणि सुदैवाने याला जवळपास सर्वच वृत्तपत्राचे संपादक, कार्यकारी संपादक, उपसंपादक, विभागीय वृत्तपत्रांचे जिल्हा प्रतिनिधी, संगणक तज्ञ, छायाचित्रकार या सर्वांचेच मिळालेले सहकार्य आणि प्रेम. यामुळे वृत्तपत्र क्षेत्रात लिखाण करताना १२ वर्षे कशी सरली ते कळालेच नाही. आजही जेव्हा मागे वळून पाहतो तेव्हा असे वाटते की, नुकतेच लिखाण सुरू केले आहे. माझ्या लिखाणाला एवढे ताजेतवाने ठेवण्याकरिता सर्वांनी दिलेली साथ आणि वाचकांचे मिळत असलेले प्रेम याबद्दल जेवढे ऋण व्यक्त करावे, जेवढे आभार मानावे तेवढे थोडेच आहे.

सन २०१३ साली मी प्रथम २७ डिसेंबरला एक लेख लिहिला होता. हा लेख संक्षिप्त करून बातमी रूपात दैनिक पार्श्वभूमी मध्ये दिनांक ३० डिसेंबर २०१३ रोजी प्रकाशित झाला होता. तेव्हापासून जी लेखणी उचलली ती आजपर्यंत ही खाली ठेवलेली नाही. म्हणूनच गेल्या १२ वर्षात आतापर्यंत हजारो बातम्या लिहिण्याची संधी मिळाली. याशिवाय शेकडो लेख सुद्धा लिहिता झालो. त्यातही ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या दुर्दशेबद्दल त्याचे नूतनीकरण व्हावे म्हणून लिहिलेला 'बीड नगरपालिका मी कारंजा टॉवर बोलतोय!' हा लेख जेव्हा दैनिक पार्श्वभूमी मध्ये ठळकपणे चांगली मोठी जागा देऊन प्रकाशित करण्यात आला आणि त्यावर काही दिवसातच अंमलबजावणी होऊन ऐतिहासिक कारंजा टॉवर चे नूतनीकरण सुरू करण्यात आले तेव्हापासून वाचकांच्या मनात एस.एम.युसूफ़ या नावाने कायमचे घर केले. या लेखाबद्दल बोलताना तर काहीजण आजही म्हणतात की, कारंजा टॉवरला सुद्धा बोलतं करणारा पत्रकार आमच्या बीड शहरात आहे.



आज जर कधी दहा पंधरा दिवस वृत्तपत्रांना बातमी दिली नाही तर अनेक वाचक फोन करून किंवा व्हाट्सअप ला मेसेज टाकून प्रश्न करतात. कुठे आहात? गेल्या अनेक दिवसांपासून तुमचं लिखाण वाचनात आलं नाही. शिवाय वृत्तपत्र क्षेत्रातील अनेक हितचिंतक सुद्धा विचारतात. सर्वांकडून मिळत असलेले हे प्रेम अत्यंत अमूल्य आहे आणि ते सहजासहजी मिळत नाही. त्यासाठी कठोर साधना आणि तपस्या करण्याची तयारी ठेवावी लागते. ती काही प्रमाणात बहुतेक माझ्याकडून होतेयं म्हणूनच की काय सर्वांचे प्रेम आणि आपुलकी मिळते.

समाजात वावरताना नजरेस येणारे मुद्दे मनाच्या गाभाऱ्यातून बुद्धीच्या कसोटीवर ताऊन-सुलाखून लेखणीच्या माध्यमातून समाजासमोर आणल्यानंतर शासन-प्रशासन दरबारी जेव्हा त्यावर कार्य होतात तेव्हा मनस्वी आनंद होतो. कारण आपण समाजात जन्माला आलो तर समाजाचे काही देणे लागतो, या भावनेतून सातत्याने वेगवेगळे प्रश्न लेखणीच्या माध्यमातून मांडण्याचे बळ मिळते. याला लोकशाहीत चौथा आधारस्तंभ म्हटल्या जाणाऱ्या पत्रकारिता क्षेत्रातील सर्व वृत्तपत्रे आणि संपादकांची पुरेपूर साथ मिळते. त्यातल्या त्यात आपला बीड जिल्हा हा सतत पुरोगामी विचारसरणीचा राहिलेला आहे म्हणूनच आपल्या बीड जिल्ह्यातील वृत्तपत्रे आणि संपादक चांगल्या लिखाणाला नेहमी वाव देतात. बीड जिल्ह्यातून प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रांसोबतच पुणे, अहेमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी या जिल्ह्यातून प्रकाशित होणारी वृत्तपत्रे सुद्धा मी पाठविलेले समाज उपयोगी बातम्या व लेख प्रकाशित करतात.

संपादक मंडळी समाज हितासाठी लिहून देण्यात येत असलेल्या बातम्या असो की लेख असो, ते प्रसिद्ध करण्यात कुचराई करत नाहीत. यामुळे समाजातील अनेक प्रश्न मार्गी लागतात. १२ वर्षाच्या लेखन कार्यात मला अनेकदा हा अनुभव आलेला आहे. नेहमी म्हटले जाते 'सौ बका, एक लिखा' त्याप्रमाणे तुम्ही तोंडी कितीही प्रश्न मांडा, त्यावर कार्य होईलच याची शाश्वती देता येत नाही. परंतु जेव्हा लेखणीच्या माध्यमातून संबंधित मुद्द्यांना आणि प्रश्नांना वाचा फोडली जाते तेव्हा शासन असो की प्रशासन त्या प्रश्नांवर, त्या मुद्द्यांवर त्यांना काम करावेच लागते. उशिराने का होईना परंतु कामे व प्रश्न मार्गी लागतातच. हेच पत्रकारितेचे, भारतीय लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाच्या यशस्वीतेचे गमक आहे. या यशस्वीतेमध्ये 'फुल ना फुलाची पाकळी' म्हणून मलाही किंचित का होईना आपल्या जिल्ह्यातील वृत्तपत्रे तसेच विभागीय वृत्तपत्रांमुळे थोडीशी जागा मिळाली आहे.